www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 241 वा शुक्रवार दि. 16 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514



**दैनिक युवक आधार** - सेंट झेवियर्स इंग्लिश हायस्कुल कोन पनवेल या हायस्कुल मधून दहावीचा निकाल जाहीर झाला असून त्या मध्ये कु कादंबरी संजय मेंढेकर या विद्यार्थीनीने ९५.८०% गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक मिळवला असुन तिच्यावर तिचे नातेवाईक मित्र मंडळी कडुन शुभेच्छा देण्यात येत आहेत

## सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे चे न्यू इंग्लिश स्कूल,कोचरी विद्यालयाचा विद्यार्थी कु.मंथन प्रमोद गुरव याने दहावी बोर्ड परीक्षेत पटकावला प्रथम क्रमांक


**दैनिक युवक आधार**



**लांजा,(केतन भोज);** सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे चे न्यू इंग्लिश स्कूल,कोचरी विद्यालयाचा विद्यार्थी कु.मंथन प्रमोद गुरव याने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २०२४-२५ मध्ये प्रशालेत ८७% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.त्याच्या या यशाबद्दल त्याचे व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व गुरुजनांचे,त्याच्या पालकांचे व सर्व संस्थेचे आदरणीय पदाधिकारी,मुख्याध्यापक तसेच सर्व गुरुजन व शिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी पालक,विद्यार्थी यांच्या वतीने कु.मंथन प्रमोद गुरव यांनी संपादित केलेल्या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे.

## कु. अर्पण कमलाकर पाटील याचे दहावी परीक्षेत सुयश

**दैनिक युवक आधार**
**पेण (प्रतिनिधी)**



येथील फणस डोंगरी येथे राहणाऱ्या गुरुकुल विद्यालयाचा विद्यार्थी कु . अर्पण कमलाकर पाटील ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC दहावी बोर्ड )परीक्षेत ७०.४० टक्के गुण प्राप्त केले आहेत. . त्याने मिळवलेल्या या यशात त्याची चिकाटी, मेहनत ,शिक्षकांसह पालकांचा देखील मोठा वाटा आहे . या यशाबद्दल कुटुंब, नातलग परिवार, मित्रमंडळी यांच्याकडून त्याचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे. पुढील उज्ज्वल भविष्यासाठी अर्पणला हार्दिक शुभेच्छा..!!

## दहावी बोर्ड परीक्षेत कु. हर्षराज हितेंद्र म्हात्रे याचे सुयश

**दैनिक युवक आधार**
**पेण (प्रतिनिधी)**



पेण येथील के ई एस लिटल एंजल इंग्लिश मिडीयम स्कूलचा विद्यार्थी कु .हर्षराज हितेंद्र पाटील याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC दहावी बोर्ड ) परीक्षेत ७९.८० टक्के गुण प्राप्त केले आहेत.
. त्याने मिळवलेल्या या यशात त्याची चिकाटी, मेहनत ,शिक्षकांसह पालकांचा देखील मोठा वाटा आहे . या यशाबद्दल कुटुंब, नातलग परिवार, मित्रमंडळी यांच्याकडून त्याचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे. हर्षराज यास पुढील उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा..!!

## दहावी बोर्ड परीक्षेत कु.निधी संदेश पाटीलचे सुयश

**दैनिक युवक आधार**
**पेण(प्रतिनिधी )**



पेण येथे राहणाऱ्या निधी संदेश पाटील हि माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी)च्या परिक्षेत ८१.८०% गुणाने उत्तीर्ण झाली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षेत पेण येथील के. ई. एस इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कूलची विद्यार्थिनी कु. निधी संदेश पाटील हिने ८१.८०% गुण मिळवत सुयश संपादन केले आहे. निधीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच शालेय अभ्यासात हुशार आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत तसेच पालकांचे व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे तिने सांगितले. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सह सर्व शिक्षकवृंद, मित्र परिवार तसेच नातलग व कुटुंबातील सदस्यांनी अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सीबीएसई दहावी, बारावी परीक्षेत खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा 100 टक्के निकाल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षेच्या निकालात शाळेने 100 टक्के यश मिळवले. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. सीबीएसई बारावीसाठी शाळेतून एकूण 205 विद्यार्थी बसले होते, ज्यात 162 विद्यार्थी विज्ञान शाखेचे आणि 43 विद्यार्थी वाणिज्य शाखेचे होते. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण केली असून विविध विषयांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. यात 46 विद्यार्थ्यांनी 90%पेक्षा अधिक गुण मिळवले. 167 विद्यार्थ्यांनी 75%पेक्षा






अधिक गुण मिळवत डिस्टिंक्शन प्राप्त केले. 100 पैकी 100 गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी 4 विद्यार्थी, गणित 1 विद्यार्थी, शारीरिक शिक्षण 1 विद्यार्थी, व्यवसाय अभ्यास 1 विद्यार्थी, अर्थशास्त्र 1 विद्यार्थी आहे. सीबीएसई दहावीला शाळेतून एकूण 290 विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात 90%पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थी 115, 75%पेक्षा जास्त गुण (विशेष प्राविण्य) प्राप्त विद्यार्थी 232 असून विषयवार 100 पैकी 100 गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स 17 विद्यार्थी, डेटा सायन्स 23 विद्यार्थी, विज्ञान 3 विद्यार्थी, गणित 1 विद्यार्थी, इंग्रजी 2 विद्यार्थी, मराठी 1 विद्यार्थी आहेत. या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शाळेतील प्रशिक्षित व समर्पित शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन तसेच मुख्याध्यापिका राज अलोनी यांचे नेतृत्व आहे. मुख्याध्यापिका अलोनी यांनी सांगितले, हा 100% निकाल केवळ आकडा नाही, तर आमच्या विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या आणि पालकांच्या अथक मेहनतीचे प्रतीक आहे. आमचे ध्येय केवळ शैक्षणिक यश नव्हे; तर मूल्याधिष्ठित, शिस्तबद्ध आणि नाविन्यपूर्ण शिक्षण देणे हे आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल भविष्यातील नेतृत्व घडवणारी संस्था म्हणून सतत प्रगतिपथावर आहे आणि शिक्षणाच्या क्षेत्रात तेजस्वी दीपस्तंभासारखी उजळत आहे. या यशाबद्दल शाळेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन करीत आनंद व्यक्त केला.

# मुंबईचा धडाकेबाज साहिल कोचरेकरची थेट राजस्थान रॅव्हेजर्स संघात निवड, 66 सुपर लीगमध्ये चमकण्याची संधी!

## कोकणचा सुपुत्र साहिल कोचरेकर!

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**


**चिपळूण (प्रतिनिधी)** .: मुंबईचा आक्रमक सलामीवीर साहिल कोचरेकर सध्या क्रिकेट वर्तुळात चर्चेचा विषय ठरलाय. त्याची निवड 66 सुपर लीग स्पर्धेसाठी राजस्थान रॅव्हेजर्स संघात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे साहिल गेल्या १३ वर्षांपासून अखंड मेहनत करत आहे आणि सातत्याने आपल्या फलंदाजीच्या जोरावर प्रत्येक संधीमध्ये स्वतःला सिद्ध करत आला आहे. त्यामुळे तो स्काऊटिंग टीमच्या विशेष नजरेत होता आणि अखेर या स्पर्धेसाठी राजस्थान रॅव्हेजर्स संघाने त्याच्याशी थेट करार केला. साहिल हा मूळचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोचरे (ता. कुडाळ) येथील आहे. साहिलने मागील हंगामात आपल्या आक्रमक फलंदाजीने साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. एका सामन्यात त्याने अवघ्या 44 चेंडूंमध्ये 130 धावा काढल्या होत्या, तर दुसऱ्या सामन्यात एका षटकात 6 षटकार ठोकण्याची पराक्रमी कामगिरी केली होती. या दोन्ही खेळींमुळे त्याच्यावर अनेक फ्रँचायझींचं लक्ष केंद्रीत झालं आणि त्याने संधी मिळालेल्या प्रत्येक सामन्यात आपली छाप सोडली. 66 सुपर लीग ही 66 चेंडूंची स्पर्धा असून यामध्ये आयपीएल, आंतरराष्ट्रीय आणि रणजीपटू सहभागी होत आहेत. अशा मोठ्या व्यासपीठावर साहिलसारख्या उगवत्या खेळाडूला खेळण्याची संधी मिळणं, हीच त्याच्या दर्जाची आणि मेहनतीची पावती मानली जाते. विशेषतः, आयपीएलच्या आगामी हंगामासाठीही ही स्पर्धा खूप महत्त्वाची ठरणार असून साहिलच्या स्फोटक फलंदाजीवर अनेक स्काऊट्स आणि फ्रँचायझींची नजर असणार आहे. राजस्थान रॅव्हेजर्स संघाच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केलं आहे की, "साहिल कोचरेकर हा आमच्या संघात गेमचेंजर ठरेल, त्याचा फॉर्म आणि शैली संघासाठी फायदेशीर ठरेल. तो सध्या ज्या पद्धतीने खेळतोय, ते पाहता या स्पर्धेत तो टॉप परफॉर्मर ठरेल अशी आम्हाला खात्री आहे." या निवडीनंतर साहिलनेही आपली भावना व्यक्त करत सांगितलं, "ही माझ्यासाठी खूप मोठी संधी आहे. गेली .१३ वर्षं मी या स्वप्नासाठी मेहनत घेतोय. प्रत्येक टप्प्यावर मी स्वतःला फलंदाज म्हणून सिद्ध केलं आहे आणि आता ती मेहनत फळ देताना दिसतेय. 66 सुपर लीगमध्ये मी माझं सर्वोत्तम देईन आणि आयपीएलकडे वाटचाल करेन." साहिलच्या या निवडीनंतर मुंबईच्या स्थानिक क्रिकेट वर्तुळात आणि चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साहाचं वातावरण आहे. त्याच्या फलंदाजीचा तडाखा आता 66 सुपर लीग मध्ये बघणं चाहत्यांसाठी पर्वणी ठरणार आहे.




# मराठा स्नेहसंवर्धन मंडळ अकोला व रामतीर्थ महादेव संस्थान नेतंसा यांचे संयुक्त विद्यमाने पुरस्कार सोहळा वितरण समारंभ कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजितसिह. ठाकुर**

मराठा स्नेहसंवर्धन मंडळ व रामतीर्थ महादेव संस्थान नेतंसा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांमध्ये मराठा मेळावा व सन्मान मेळावा, पुरस्काराचे वितरण समारोह आयोजित केला आहे. समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे व त्यांना ऊर्जा मिळावी त्याकरीता या कार्यक्रमासाठी या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय नामदार प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री यांचे हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समाजभूषण डॉ. भुषण मापारी हृदयरोगतज्ज्ञ अकोला, स्वागताध्यक्ष डॉ. राम शिंदे मेहकर, या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये मराठा स्नेहसंवर्धन मंडळ अकोला व रामतीर्थ महादेव संस्थान नेतंसा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांमध्ये मराठा मेळावा व पुरस्कार सन्मान मेळावा आयोजित केला आहे. समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावी व त्यांना ऊर्जा मिळावी त्याकरिता या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय नामदार प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री यांचे



हस्ते या कार्याक्रमाचे उद्घाटन होणार असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समाजभूषण डॉ. भुषण मापारी हृदयरोगतज्ज्ञ अकोला, स्वागतोत्सुक डॉ राम शिंदे मेहकर, या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत त्यामध्येआमदार अमित झनक, आमदार किरणराव सरनाईक, आमदार भावना ताई गवळी, राजेंद्र शिंगणे माजी मंत्री, विजयराव जाधव माजी आमदार, डॉ. दीपक मोरे अकोला, दिलीपराव नानवटे अध्यक्ष मराठा पाटील संघटना अकोला, सुरेश देवकर संस्थापक अध्यक्ष अदिती अर्बन बँक बुलढाणा, देवेंद्र भाऊ खडसे उद्योजक, भास्कर काळे राष्ट्रवादी नेते, बाबाराव खडसे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वाशिम, ज्योतीताई गणेशपुरे माजी अध्यक्ष वाशीम, नारायणराव काळबांडे जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ वाशिम, शिवमती सविता मोरे जिल्हाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड वाशिम, डॉ. दिपक शेळके नेत्र रोग तज्ञ वाशीम, डॉ. अनिल कावरखे जिल्हा शल्य चिकित्सक वाशिम, राजूभाऊ पळसकर मा.जी.प.कृषी सभापती बुलढाणा, बाळासाहेब खरात माजी सभापती रिसोड, माधवराव अंभोरे जेष्ठ पत्रकार,विनोद बोरे लेखक तथा संपादक जनस्वप्नपूर्ती, डॉ.संतोष काकडे एम डी मेडिसीन, डॉ.अजय पाटील, भाऊसाहेब काळे अध्यक्ष मराठा समाज सेवा मंडळ अकोला, गजानन पाचरणे माजी सभापती, सहदेवराव शिंदे विठ्ठल परिवार पंढरपूर, वसंतराव धाडवे समाजसेवक, चंद्रकांत अवचार अध्यक्ष आस्था रोग फाऊंडेशन अकोला,शिवमती स्वाती गोरे जिल्हा सचीव जिजाऊ ब्रिगेड, दिनकरराव बोडखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.हा कार्यक्रम दिनांक १८ मे २०२५ सायं. ५ वाजता नेतंसा, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला निमंत्रित पत्रकार मंडळी, रामतीर्थ महादेव संस्थानचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, जय भोले मित्र मंडळ, कावड मंडळ, जय भवानी मंडळ सर्व गावकरी मंडळी नेतंसा या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व स्वागतोत्सुक डॉ. गजानन बाजड अध्यक्ष रामतीर्थ महादेव संस्थान नेतंसा

# खेळणा मध्यम प्रकल्प येथे गाळ मुक्त धरण,गाळ युक्त शिवार योजनेअंतर्गत गाळ काढण्याचा आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी :-**
**योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : - सिल्लोड येथील खेळणा मध्यम प्रकल्प येथे गाळ मुक्त धरण, गाळ युक्त शिवार योजनेअंतर्गत गाळ काढण्याचा शुभारंभ आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाला.
खेळणा मध्यम प्रकल्पातून गाळ काढून देण्यासाठी शासनाच्या वतीने मोफत यंत्र सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे या संधीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आ. अब्दुल सत्तार यांनी यावेळी केले. पुढे बोलत असताना आ. अब्दुल सत्तार म्हणाले की, गाळमुक्त धरणामुळे धरणातील जलसाठा वाढेल, तसेच गाळयुक्त शिवार मुळे जमीन सुपीक होण्यास मदत होईल. धरणातील गाळ शेतात टाकल्याने शेतकऱ्यांना अधिकचे उत्पादन होईल तसेच गाळमुक्त धरणामुळे मतदारसंघातील धरणातील जलसाठे वाढतील यामुळे पिण्याच्या पाण्यासह सिंचन क्षेत्राला लाभ होईल. जलसमृद्धी व



शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने गाळमुक्त धरण , गाळ युक्त शिवार योजनेची अधिकाऱ्यांनी जनजागृती करावी अशा सूचना देखील आ. अब्दुल सत्तार यांनी दिल्या. सिल्लोड - सोयगाव मतदारसंघातील मध्यम व लघु प्रकल्पातील जलसाठा वाढण्याच्या अनुषंगाने गाळ मुक्त धरण, गाळ युक्त शिवार योजने संदर्भात शासन निर्णयानुसार गाळ काढण्याबाबत यंत्र सामुग्री उपलब्ध करून देण्यात येऊन देवून योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करा याबाबतचे पत्र आमदार अब्दुल सत्तार यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्र दिले होते. त्याअनुषंगाने संबंधित विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना मोफत गाळ काढून देण्यासाठी यंत्र सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता फक्त गाळ वाहून नेणे आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार संजय भोसले ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास दाभाडे, माजी सभापती रामदास पालोदकर , कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, नानासाहेब रहाटे, नॅशनल सह सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, शेख सलीम हुसेन, सयाजी वाघ, नासेर पठाण, उपसरपंच मच्छीन्द्र पालोदकर, रमेश पालोदकर, विनोद काटकर, रघुनाथ कल्याणकर, कल्याण डवणे ,विश्वनाथ डापके आदींची उपस्थिती होती.

# दहावीच्या परीक्षेत कोमल खाकाळ तनुजा राठोड प्रथम

दैनिक युवक आधार
बाळासाहेब रकटाटे
आष्टी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील आंबेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता दहावीचा निकाल लागला असून या विद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा राखत यश मिळवले आहे.
यामध्ये कोमल नामदेव खाकाळ 94.60 तनुजा सुभाष राठोड 94.60 गुण मिळवून या दोघींनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.
तर प्रथम ज्ञानेश्वर ओव्हाळ 94.20 इतके गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर आकांक्षा सुनील वाघमारे 90.80 गुण मिळून तृतीय क्रमांक पटकावला आहे. चतुर्थ क्रमांक मयुरी सुरेश थोरात 94.60 इतके गुण मिळवून क्रमांक मिळवला आहे.
या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## अपर तहसील कार्यालयाची तेरा वाहनांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : अपर तहसील कार्यालय पनवेलने माती आणि गौण खनिजाची ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या 13 गाड्यांवर कारवाई केली असून या गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. पनवेल तालुक्यात अनेक ठिकाणी माती उत्खनन सुरू आहे. अनेक मोठमोठ्या वाहनांमध्ये जास्त प्रमाणात गौण खनिज भरून त्याची वाहतूक केली जाते. खारपाडा ते पनवेल परिसरात अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांच्या निर्देशानुसार नायब तहसीलदार संभाजी शेलार, मंडळ अधिकारी तेजस चोरघे आणि इतर व तलाठी यांनी कारवाई करत माती आणि गौण खनिजाच्या तेरा गाड्यांवर कारवाई केली. आणि या गाड्या जप्त केल्या. अशाच प्रकारची कारवाई यापुढे देखील सुरू राहणार असल्याची माहिती अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी दिली.



## विविध गुन्ह्यातील सहा वाहनांचा पनवेल शहर पोलिसांकडून करण्यात येणार लिलाव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**
पनवेल शहर पोलीस ठाणे येथे विविध गुन्हयांमध्ये एकूण 06 वाहने जप्त करण्यात आलेली असून सदर वाहनांचे मुळ मालकांचा शोध घेतला परंतु ते मिळून येत नाहीत. सदरच्या गाड्या ब-याच कालावधीपासून पोलीस ठाणे आवारात पडून आहेत. त्यांचे मुळ मालक मिळून येत नसल्याने प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया केली जाणार आहे. तत्पुर्वी वरील नमुद वाहनांबाबत आजपर्यंत कोणीही सदर वाहनांचे मालकीबाबत दावा दाखल केलेला नाही. मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी कळंबोली यांचेकडे उपलब्ध वाहनांचे आरटीओ रजि. नंबर, इंजिन नंबर, चेसीज नंबरची पडताळणी केली असता सदर वाहनांचे मालक मिळून आले नाहीत. सदर गुन्हयातील जप्त वाहने ही भंगारात कश करून त्याचा लिलाव करण्याची मा. न्यायालयाने परवानगी दिली असून सदर वाहनांचा दिनांक 16/05/2025 रोजी 10.00 वा. रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे आवारात लिलाव करण्यात येणार असून त्यासाठी इच्छुकांनी तत्पुर्वी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## तरुणी बेपत्ता



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : राहत्या घरातून एक तरुणी कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.
निकिता रामदास कातकरी (21 रा.पळस्पे गाव) असे या तरुणीचे नाव असून बांधा मजबूत, चेहरा गोल, डोळे काळे, नाक बसके, उंची 4 फुट असून अंगात चॉकलेटी रंगाचा टॉप व पांढऱ्या रंगाची लेगिझ परिधान केलेली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.ना.चव्हाण मो.नं.8424032111 येथे संपर्क साधावा.

## स्वा.सै.पं.ध.थेपडे माध्यमिक विद्यालय, म्हसावद चे दहावीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**
जळगाव तालुक्यातील तालुका म्हसावद येथील स्वातंत्र्य सैनिक पं.ध.थेपडे माध्यमिक विद्यालयाचा 10 वी चा निकाल 93.54% लागला असुन यात विद्यालयातील 61 विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये ,प्रथम श्रेणीत 57, द्वितीय श्रेणीत 51 आणि 5 विद्यार्थी पास क्लास मध्ये उत्तीर्ण झाले.
**प्रथम--कु. लक्षिता अरविंद चौधरी 92.40%**
**्वितीय--ओम विजयकुमार वाघ--92.20.%**
**तृतीय--कु. दीक्षा दिनेश चव्हाण 91.60%**
यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थीनींचे संस्थेचे चेअरमन माननीय डॉ. केदारजी थेपडे साहेब, सन्माननीय संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक पी. डी. चौधरी सर, उपमुख्याध्यापक बच्छाव सर, पर्यवेक्षक के .पी.पाटील सर, इयत्ता दहावीच्या तिन्ही तुकड्यांचे वर्गशिक्षक आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर बंधु-भगिनींनी तसेच पालकांनी अभिनंदन केले




# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जागतिक परिचारिका दिन साजरा

## विविध उपक्रमातंर्गत परिचारिकांच्या कार्याचा केला गौरव

**दैनिक युवक आधार**
***नवी मुंबई वार्ताहर**
आधुनिक नर्सिंगचा पाया रचणाऱ्या फ्लोरेन्स फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा जन्मदिवस हा दरवर्षी जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो.
परिचारिका दिनानिमित्त, मेडिकव्हर हॉस्पिटलने परिचारिकांकरिता विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन केले होते यावेळी परिचारीकांविषयी कृज्ञता व्यक्त करुन त्यांच्या कामाचे कौतुकही करण्यात आले. आमच्या परिचारिका हेच आमचे भविष्य आहे आणि या परिचारिकांची काळजी घेणे ही अर्थव्यवस्थेला बळकटी



आणते. या संकल्पनेतंर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आरोग्यसेवेतील परिचारिकांच्या निस्वार्थ सेवेचा आणि महत्त्वपूर्ण भूमिकेचा याठिकाणी सन्मान करण्यात आला. रुग्णसेवेतील क्रांतीचा मागोवा घेणारी विशेष चित्रफित याठिकाणी सादर करण्यात आली. त्याचबरोबर नृत्याविष्कार, नाटक, गायन, फॅशन शो आणि विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी परिचारिकांना त्यांचे कलागुण सादर करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमात सुमारे ६० परिचारिका सहभागी झाल्या होत्या. परिचारिका हा आरोग्यसेवेचा मुख्य पाया आहे. निस्वार्थ रुग्णसेवा करत परिचारिका आपली भूमिका चोखपणे निभावतात. रुग्णांच्या पुनर्प्राप्तीसाठी आणि रुग्णालयांच्या सुरळीत कामकाजात त्यांचा मोठा वाटा आहे. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये, आम्ही आमच्या परिचारिकांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचा कार्याला सलाम करतो. दैनंदिन कामाबरोबरच परिचारिकांना काही आनंदाचे क्षण घालविता यावे याकरिता हा उपक्रम राबविल्याची माहिती मेडिकव्हर हॉस्पिटल केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी स्पष्ट केले. या खास निमित्ताने नर्सिंग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या परिचारिकांचा गौरव करण्यात आला.

## शिवसेनेचे पनवेल महानगरपालिका सहसंपर्कप्रमुख बाळाराम मुंबईकर यांचे निधन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पनवेल महानगरपालिका सह संपर्कप्रमुख बाळाराम मुंबईकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी तळोजा भोईरपाडा येथील राहत्या घरी वयाच्या 68 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. बाळाराम मुंबईकर यांनी यापूर्वी शिवसेनेच्या तळोजा विभागप्रमुख आणि पनवेल उपतालुकाप्रमुखपदाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली होती. 1967 पासून शिवसेनेत सक्रिय असून, पक्ष स्थापनेपासून (1966) जवळजवळ पहिल्या टप्प्यातील कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती, असे शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी सांगितले. शिवसेनेनं एक कडवा, निष्ठावान कार्यकर्ता गमावला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. राजकारणासोबतच बाळाराम मुंबईकर यांचा अध्यात्मिक जीवनातही सक्रिय सहभाग होता. ते वारकरी संप्रदायाचे अनुयायी होते आणि दरवर्षी आळंदीची पायी वारी करायचे. त्यांना भजनाची विशेष आवड होती. त्यांच्या अंत्ययात्रेला राजकीय, सामाजिक तसेच परमार्थिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

## स्व. तुळसाबाई करडे विद्यालयाचा निकाल शंभर टक्के .



कारंजा लाडः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च मध्यमिक शिक्षण मंडळाने १३ जून रोजी माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा मार्च २०२५ चा ऑनलाईन निकाल घोषित केला आहे.त्यामध्ये स्व. तुळसाबाई करडे माध्यमिक विद्यालय किन्ही कारंजा, माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षा २०२५ चा निकाल शंभर टक्के लागला आहे. सदर परिक्षेला या विद्यालयातून 30 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.त्यापैकी 3 विद्यार्थी प्राविन्य श्रेणीत, ७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, १६ उत्तीर्ण द्वितीय श्रेणित तर 4 विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. कु. तनुजा गजानन जाधव ८० . ४०% गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. धनश्री मिलिंद शिंदे हिने ७६ . ६०% गुण घेऊन द्वितीय क्रमांक, कु. अंतरा रवींद्र अघमे हीने ७६% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. शाळेचे संस्थाध्यक्ष निरंजनजी करडे, मुख्याधापिका कु. प्रिया करडे शिक्षक दिनेश इंगोले, मयुरी राऊत प्रशांत अघमे शिक्षकेतर कर्मचारी अमित करडे, सचिन महाजन, सुधाकर बनसोड, अविनाश झाटे, अजिंक्य भेंडे यांनी अभिनंदन केले आहे.

# भाजपा पक्ष श्रेष्ठीने उमरी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कवळे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली लढवाव्यात - किशनदादा गायकवाड कुदळेकर

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड -** उमरी मा. सुप्रीम कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबर २०२५ पुर्वी घ्यावे असा आदेश महाराष्ट्र निवडणूक आयोगाला दिलेला आहे. उमरी तालुक्यातील नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यत्व तीन वर्षांपूर्वी बरखास्त झालेले असुन संबंधित कार्यालयात प्रशासक राज चालू असुन त्यांचा मनमानी कारभार चालु आहे. सर्व सामान्य नागरिकांचे कोणतेच कामे वेळेवर होत नाहीत. यामुळे उमरी तालुक्यातील शेतकरी, विद्यार्थी, कष्टकरी या प्रशासकीय अधिका-याच्या वागणुकीला वैतागून गेलेली आहे. सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत करून प्रत्येक जाती धर्माच्या सुखा दुखात धावुन जाऊन २४ तास जनतेच्या मदतीसाठी सदैव तत्पर



असतात. रात्री बेरात्री शेतकरी व कार्यकर्त्यांचा फोन उचलून प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणारे आणि शेतकरी व कष्टकरी, कामगार, कर्मचारी, बेरोजगारांचा अन्न दाता मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांना तळागाळातील जनसामान्य कार्यकर्त्यांची जनतेची जाणीव आहे. कै.आ.बाबासाहेब देशमुख गोरठेकर व माजी आ. कै.बापुसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या नेतृत्वाखाली त्या काळी उमरी तालुक्यातील नगर परिषद उमरी, पंचायत समिती उमरी, जिल्हा परिषद तळेगाव गट व गोरठा गटांचे उमेदवार अनेक वेळा निवडून आणलेले असुन राजकारणाचा त्यांना दांडगा अनुभव आहे. उमरी नगर परिषद, पंचायत समिती व नांदेड जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पार्टीचा भगवा झेंडा फडकावयचा असेल तर महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ अजित गोपछडे, आ.राजेश पवार, भाजपाचे नांदेड ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे इत्यादी पक्ष श्रेष्ठीने विचार पुर्वक निर्णय घेऊन शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली उमरी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवाव्यात असे मत भाजपाचे माजी उमरी तालुकाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केलेले आहेत

## मनसे पनवेल तालुका व नितळस ग्रामस्थांच्या सहकार्याने महिलांसाठी प्रशिक्षण ट्रेनिंग सेंटर ची उभारनी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
**एक नवीन संकल्पना महिलांसाठी**
आज काही दिवसापूर्वी मनसे पनवेल तालुका व काही फाउंडेशनच्या व नितळस ग्रामस्थांच्या सहकार्याने त्या ठिकाणी विविध गावातील नवतरुण महिला गरजू महिला नवतरुण युवति यांना भक्कम असा प्रशिक्षण ट्रेनिंग सेंटर उभारण्यात आला आहे, उद्या एखाद्या महिलेवर घर खर्चाची जबाबदारी आली तर ती मागे पुढे न बघता स्वतः आपले हात बळकट करून ती या प्रशिक्षणाच्या माध्यमातून ट्रेनिंग शिक्षण घेतलेल्या महिला स्वतः उद्योग बिजनेस करू शकतील, स्त्रियांचा हात बळकट करण्यासाठी आमची एक संकल्पना आणखी गावागावातील महिलांना त्यांच्यापर्यंत संपर्क व त्यांना मोफत या सुविधांचा लाभ घेण्यासाठी महिला वर्ग मोठ्या प्रमाणात नोकरी न करता स्वतःचा एक छोटासा उद्योग उभारू शकते विविध स्कीम राबवल्या जातील ट्रेनिंग देणारे मास्टर , मॅडम जयश्री जाधव, मॅडम अचल म्हात्रे,






संध्या भोईर ,कविता भोईर, टेलरिंग आरिवर, फॅशन डिझायनर, केक ट्रेनिंग, , ब्युटी पार्लर, आणखी आजूबाजूच्या गावातील महिलांना त्या ठिकाणी मोफत या पूर्ण स्कीम शिकायची असतील तर संपर्क साधा, आणि आपले स्त्रीशक्तीचे हात बळकट करा , विविध प्रशिक्षण राबवण्यासाठी आपल्या सोबत, श्री रामदास पाटील मनसे पनवेल तालुका अध्यक्ष, आहेत, तसेच स्थानिक नागरिक,

## वाशिष्ठी डेअरीच्या शॉपीचा चिपळूण बाजारपेठेत शुभारंभ

### प्रशांत यादव यांच्या हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण वार्ताहर**
कोकणातील लोकप्रिय वाशिष्ठी मिल्क अण्ड मिल्क प्रॉडक्ट्सच्या ३६ व्या शॉपीचे चिपळूणमधील जुने बस स्थानक येथील इब्राहिम कॉम्प्लेक्समध्ये मोठ्या उत्साहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव यांच्या हस्ते सोमवारी झाले. वाशिष्ठी मिल्क अण्ड मिल्क प्रॉडक्टचे चेअरमन प्रशांत यादव, मालघर गावचे सरपंच सुनील वाजे, फ्रेंच्यायशी ओनर विनोद महाडिक, वैष्णवी महाडिक,
नरेश झगडे, संदीप घोले, दिनेश महाडिक, श्रीकृष्ण तटकरे, महेश किलजे मंगेश महाडिक, मनीषा महाडिक, सुनील महाडिक, रसिका महाडिक, शशिकांत महाडिक, सानिका महाडिक, समीर जांगळी, सोनाली जांगळी, समीर महाडिक, स्वप्नाली महाडिक, वैभव आवले, राधिका महाडिक, सुरज दाते, सागर भालेकर, नंदकुमार किलजे, सुनील



तांबडे, गंगाराम महाडिक, प्रकाश लटके, राष्ट्रवादीचे तालुका खजिनदार शमून घारे, जिल्हा उपाध्यक्ष गुलजार कुरवले, शहर उपाध्यक्ष मुन्ना दळी, विजय खापरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शॉपीच्या उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशीच ग्राहकांनी खरेदीसाठी एकच गर्दी केली होती. तर वाशिष्ठी डेअरीने नुकतेच सुरू केलेल्या विविध प्रकारच्या आईस्क्रीमलाही ग्राहकांची चांगलीच पसंती दिसली. आईस्क्रीम, दूध, दही, श्रीखंड, आम्रखंड, ताक, गाई व म्हैस तूप, पनीर तसेच इतर दुग्धजन्य असंख्य पदार्थ वाशिष्ठीच्या शॉपीमध्ये विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहेत.

# ग्रामीण भागातील माध्यमिक विद्यालये आता एसएससी बोर्डाच्या निकालातही अव्वल

**दैनिक युवक आधार**
**सातारा वार्ताहर**
जिंती ता. कराड, जि. सातारा येथील ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळेचे, श्री जोतिर्लिंग विद्यालय जिंती ता.कराड या विद्यालयाचा एसएससी बोर्ड परीक्षा मार्च २०२५ चा निकाल शंभर टक्के लागल्याने विद्यार्थी व पालक वर्गात समाधान व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे ग्रामीण भागात गुणवत्तेच्या बाबतीत पालक वर्ग नाखुश असल्याने आपल्या पाल्याला शहरातल्या प्रतीत यश विद्यालयात किंवा भलीमोठी फी भरून अकॅडमीला घालण्याकडे पालकांचा कल दिसून येत आहे, परंतु सध्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता पाहता प्रतीतयश अकॅडमी पेक्षा सरस गुणवत्तेने विद्यार्थी यश प्राप्त करत असल्याचे दिसून येत आहे. कराड दक्षिणच्या डोंगराळ भागात, ग्रामीण क्षेत्रात ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळे या संस्थेचे शैक्षणिक कार्य सुरू आहे,उंडाळे, जिंती, गोटेवाडी, तुळसण, येणपे, बामणवाडी, कोणेगाव, कराड यासारख्या ग्रामीण भागात माध्यमिक विद्यालय सुरू करून ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक उन्नतीचे केंद्र ही संस्था बनली आहे. संस्थेने चालविलेले जिंती सारख्या एका ग्रामीण भागात श्री जोतिर्लिंग विद्यालय जिंती या नावाने




सुरू असलेल्या विद्यालयाचा मार्च २०२५ चा एसएससी बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी **अव्वल गुणवत्ता ही प्राप्त केली आहे.**
१ पाटील प्रतीक्षा मोहन 94.40
२ पाटील साक्षी आनंदा 89.00
३ पाटील वैष्णवी जयकर 87.80
४ बागल वैष्णवी विकास 80.00
५ लोखंडे आर्या अमोल 79.80
**या विद्यार्थ्यांनी पटकावला आहे.**
हे सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असून ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळेचे अध्यक्ष एडवोकेट मा. आनंदराव पाटील राजाभाऊ, उपाध्यक्ष शंकर अण्णा पाटील (दादा)गुरुजी , सचिव बी आर यादव सर व सर्व संचालक पदाधिकारी ग्रामस्थ, पालक व ज्ञानप्रबोधिनी फाउंडेशन जिंती चे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. श्री जोतिर्लिंग विद्यालय जिंती चे मुख्याध्यापक अशोक कोठावळे, इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक संभाजी खोचरे, उपशिक्षिका ,वनिता कुंभार, रूपाली माळी, उपशिक्षक गणेश तपासे, दिनकर आंबवडे, लिपिक विजय धाईगडे, सेवक संदीप मोहिते (दादा) इत्यादी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# 42 डिग्री तापमानात आम आदमी पार्टीने केले भर उन्हात उपोषण : आपच्या उपोषणाला यश

### खोपोली शिळफाटा येथील राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकरच होणार सुरू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 खोपोली शिळफाटा येथे निमुळता असल्याकारणाने तेथे प्रचंड प्रमाणात अपघात होत असतात व दररोज वाहतुकीची कोंडी होत असते. सदर रस्ता रुंदीकरणासाठी आम आदमी पार्टी तर्फे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण खोपोली शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर 42 डिग्री तापमानात भर उन्हात करण्यात आले. सदर उपोषणासाठी व रस्ता ररुंदीकरणासाठी खोपोली शिळफाटा व्यापारी असोसिएशन यांनी सक्रिय पाठिंबा दर्शवला असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना तशा प्रकारचे पत्र देण्यात येणार आहे. आम आदमी पार्टी मागील दोन वर्षापासून सदर रस्ता रुंदीकरणासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे पाठपुरावा करीत आहे परंतु अजूनही रस्त्याचा काम सुरू न झाल्या कारणाने आम आदमी पार्टी तर्फे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे लक्ष वेधण्यासाठी सदर उपोषण करण्यात आले आहे असे आप खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान यांनी




सांगितले सदर उपोषणाची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी दखल घेतली असून पुढील आठ दिवसात सदर रस्त्याचे सुधारित प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे पाठवण्यात येईल व लवकरात लवकर रस्त्याचे काम सुरू करू असे आश्वासन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उपविभागीय अभियंता श्री विकास पिंपळकर यांनी दिले. आम आदमी पार्टी ही सामान्य जनतेच्या लढ्यासाठी सदैव तत्पर आहे व सध्या आम्ही हे उपोषण स्थगित करत आहोत परंतु पुढील काळात रस्त्याचे काम सुरू न झाल्यास आमरण उपोषण करू असे आपचे संघटन मंत्री डॉ. पठाण यांनी सांगितले. सदर उपोषणासाठी आप प्रदेश संघटन मंत्री डॉ रियाज पठाण, आप खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान, खोपोली शहर उपाध्यक्ष विवेक वाघमारे, शहर सचिव चंद्रप्रकाश उपाध्याय, तालुका उपाध्यक्ष कस्तुरचंद राठोड, प्रभाग 5 अध्यक्ष भगवान पवार व अन्य सहकारी बसले होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## जासई हायस्कूल मधील दहावी व बारावी विद्यार्थ्यांचे घवघवीत यश.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा.पाटील ज्युनिअर कॉलेज , जासई हे उरण तालुक्यातील एक नावाजलेले हायस्कूल आहे .दरवर्षीप्रमाणे आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षीही सन – २०२४– २०२५ मद्धे बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९४.८०% तर कला शाखेचा निकाल ६३.०१% लागला आहे . त्याचबरोबर दहावीचा निकाल ८५.९४% लागला आहे . यामध्येइयत्ता दहावी मद्धे नावंदे कमलाकर राजेश्वर ९४.२०% गुण मिळवून प्रथम तर घरत साहिल प्रशांत ९४% गुण मिळवून द्वितीय आणि कुमारी घोरपडे अंकिता गणेश ९०.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे बारावी मद्धे कला शाखेत कुमारी तनिषा विजय ठाकूर ६२% गुण मिळवून प्रथम तर कुमारी संजना गौतम पडघने ५९.६७% गुण मिळवून द्वितीय व कुमारी वेदिका दिगंबर कोळी ५७.८३% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे . विज्ञान शाखेत कुमारी दुबे आरती संजीत ८१.३३% गुण मिळवून प्रथम तर कुमारी दुबे राधिका संजीत ७२%गुण मिळवून द्वितीय आणि म्हात्रे पृथ्वी रविंद्र ६८.८३% गुण मिळवून तृतीय आला आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन , सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य , विद्यालयाच्या प्राचार्या सौ. म्हात्रे के.जी. मॅडम , उपमुख्याध्यक श्री . कुटे सर , पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम , शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले . सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन : पूर्वक अभिनंदन ! आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## संदीप पाटील यांचा सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**




संदीप पाटील सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असतात त्यामुळे ते वयाच्या पन्नाशीनंतरही आणखी जोमाने आणि उमेदीने कार्यरत राहतील असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले. ते माजी नगराध्यक्ष आणि भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महिलांसाठी कबड्डी स्पर्धेवेळी बोलत होते.यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक गणेश कडू, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, वर्षा नाईक, भीमराव पोवार, विजय म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा पाटील, रवी नाईक, सूर्यकांत ठाकूर आदी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, संदीप पाटील यांना खेळाची आवड आहे म्हणून त्यांचा फिटनेस चांगला आहे. खेळांना ते प्रोत्साहन देत असतात.सामाजिक कार्यात अग्रेसर राहून नागरिकांना सुविधा देणे, विविध योजना राबविणे हे त्यांचे काम सुरू असते. भविष्यात त्यांना आणखी जोमाने काम करायचे आहे आणि मोठे सामाजिक कार्य त्यांच्या हातून घडावे अशी शुभेच्छा दिल्या. तर माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात, ओम साई कलावंत मंडळाने माझ्या अनुपस्थितीत ही जिल्हास्तरीय कबड्डीची लिग स्पर्धा आयोजित केली. नागरिकांनी मला सामाजिक कार्याची संधी दिली त्यामुळे मी इथपर्यंत पोहोचलो..भाजपा आणि आमचे मार्गदर्शक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून आणखी उत्तरोत्तर प्रगती करता येईल, नागरिकांची कामे करता येतील असेही पाटील म्हणाले. ही जिल्हास्तरीय लिग स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ओम साई कलावंत मंडळाने नितीन चोरघे, मयुर कदम, अभिजित दिवेकर, सुयोग पाटील,प्रमोद म्हामुणकर,मंगेश घरत आदींनी प्रयत्न केले. तर या स्पर्धेत वृतिक्षा स्पोर्ट्स क्लब पेण, कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी पनवेल, दिलखुश क्रीडा मंडळ अलिबाग,श्री सुवर्ण गणेश दिवे आगार या संघांनी सहभाग घेतला.

## कळंबोलीत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा; १७ व १८ मे रोजी होणार थरारक सामने

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



भारतीय जनता पार्टी व युवा मोर्चा कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार १७ मे व रविवार १८ मे रोजी कळंबोलीत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रोडपाली येथील नवीन बस डेपो जवळील मैदानावर दिवस–रात्र रंगणार असून स्थानिक क्रिकेट प्रेमींसाठी ती पर्वणी ठरणार आहे. तसेच विविध संघांमध्ये चुरस पाहायला मिळणार असून स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे, त्यामध्ये स्पर्धेतील प्रथम पारितोषिक २१ हजार १११ रुपये व भव्य चषक, द्वितीय क्रमांकाला ११ हजार १११ तर तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५ हजार ५५५ रुपये व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमुळे परिसरातील युवकांना खेळातील कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

## पुणे महापालिकेवर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा झेंडा फडकणार संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश माने,

**दैनिक युवक आधार**
**पुणे प्रतिनिधी**




कार्यकर्त्यांनी एकत्र राहून पक्षाची ताकद वाढवावे पक्ष बळकट करून पक्षाच्यावतीने महापालिका, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत, समिती, या ठिकाणी पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडून द्यावे, आणि बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा झेंडा पुणे महानगरपालिकेत फडकणार असे मत बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट, डॉ, सुरेश माने यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आगामी निवडणूक लढवण्यासंदर्भात पुढील सूचना दिल्या,

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या पुणे जिल्ह्याच्या वतीने पुणे येथील शासकीय विश्रामगृह येथे कार्यकर्त्यांची बैठक आयोजन करण्यात आली होती,

यामध्ये संघटन बांधणी व आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक विषयी बैठक पार पडली यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एडवोकेट, डॉ, सुरेश माने यांच्या हस्ते विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या करून त्यांना नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले होते, यावेळी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे पुणे शहराध्यक्ष अमोल तुजारे, विजय जगताप महासचिव पुणे शहर, अभय शेलार सचिव पुणे शहर, प्रकाश रास्ते अध्यक्ष शिवाजीनगर विधानसभा, संदीप गंगावणे अध्यक्ष वडगाव शेरी विधानसभा, दत्तात्रय शिंदे अध्यक्ष भोसरी विधानसभा, रवी कांबळे अध्यक्ष पुणे जिल्हा, अंबादास बनसोडे, अध्यक्ष पुणे जिल्हा अधिवक्ता आघाडी मिलिंद माचले पुणे जिल्हा शिक्षक, अरुण गायकवाड सचिव पिंपरी चिंचवड, इत्यादींची नियुक्ती करण्यात आली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धिरज बगाडे सचिव, महाराष्ट्र प्रदेश बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी यांनी केले

## रत्नागिरी जिल्ह्यातील कोतापूर गावचे सुपुत्र रविंद्र बाबाजी जाधव कोतापकर यांना महाराष्ट्रचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते कामगार कल्याण मंडळा चा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार बहाल.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:वार्ताहर**




संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार हेच विकसित महाराष्ट्राचे खरे शिल्पकार असून त्यांच्या मेहनतीमुळेच महाराष्ट्राचा विकास शक्य झाला आहे. या कामगारांच्या सहभागाशिवाय देशाची, राज्याची प्रगती होऊ शकणार नाही, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी मंगळवारी केले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ३६ वे कामगार भूषण पुरस्कार व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारांचे वितरण राज्यपालांच्या हस्ते कामगार क्रीडा भवनात करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आ. मनोज जामसुतकर, आ. मनीषा कायंदे, प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी उपस्थित होते.

रत्नागिरी जिल्यातील कोतापूर गावचे सुपुत्र आणि विचारे एक्सप्रेस अँड लॉजिस्टिक प्रा. ली. मुंबई चे कर्मचारी यांना प्रदान करण्यात आला. तर, नोकरी करूनही विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार (प्रत्येकी २५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र) देण्यात आले. मंडळाने मुंबईत तयार केलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा इतर जिल्ह्यांतही उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. राज्यातील बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मंडळाने कौशल्य विभागासोबत काम करावे. कामगार, युनियन, उद्योजक यांच्यात सामंजस्य, संवाद व शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी कामगार विभागाने पुढाकार घेत राहणे आवश्यक आहे, असे देखील राज्यपाल म्हणाले.

## लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, ने सलग १३ व्या वर्षी ही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा शहरातील नामांकित इंग्लिश स्कूल, लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल चा दहावी बोर्ड परीक्षेत नेहमी प्रमाणे सलग १३ व्या वर्षीही शंभर टक्के निकाल लागला असून सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे कौतुक होत आहे. या वर्षी देखील शालेय विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. अनुक्रमे जानकी अभिजित वैद्य हिने ९१.६० टक्के, असीम समीर सय्यद याने ९०.६० टक्के, ओम भाऊसाहेब सावंत याने ९० टक्के तर, सुवेज पठाण आणि जावळे आयुष यांनी ८६ टक्के मार्क्स मिळवून इंग्रजी माध्यमातून तालुक्यातून पहिल्या पाच मध्ये येण्याचा मान मिळवला आहे. तसेच कुमारी दगडे अक्षरा, कोकाटे शिवतेज, भोसले अभय, मौला औझफ, मौला आहद, यांनी ही गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे. या यशा बद्दल शाळेचे संस्था प्रमुख श्री.पठाण सर, शालेय पर्यवेक्षिका सीमा माळी मॅडम, वर्ग शिक्षिका वसुंधरा एकबोटे मॅडम, सानप कृष्णा सर, या वर्षी पासूनचे गणित तज्ञ श्री कांतिलाल घोलप सर, परीक्षा विभाग प्रमुख सावंत सर, अर्जुन सानप सर, उज्वला भोसले मॅडम, शाहिद सर, सुजित घोलप सर यांनी मुलांचे कौतुक आणि अभिनंदन केले आहे. शाळेने आत्ता पर्यंत दहावी बोर्डाच्या तेरा बॅच यशस्वी रित्या पास आऊट केल्या असून, विद्यार्थ्यांनी दरवर्षी गुणवत्ता यादीत येऊन शाळेचा, पालकांचा आणि तालुक्याचा मान उंचावला आहे. या यशा साठी सर्वांचे पालक वर्ग आणि सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## ट्रॅफिक अडथळा करणाऱ्या चारचाकी वाहनांवर महापालिकेची कारवाई; आता स्वतःची टोईंग क्रेन वापरणार

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर :**

शहरातील रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या चारचाकी वाहनांवर आता महापालिकेच्याच ट्रॅफिक वॉर्डन पथकाकडून थेट कारवाई केली जाणार आहे. महापालिकेने स्वतःची टोईंग क्रेन आणि वाहने खरेदी करून या कारवाईची जबाबदारी स्वतःच्या यंत्रणेकडे दिली आहे. यापूर्वी ही कारवाई खासगी एजन्सीमार्फत केली जात होती. मात्र, आता महापालिकेच्या परिवहन विभागाअंतर्गत ट्रॅफिक वॉर्डन या पदावर मनुष्यबळ नियुक्त करून त्यांना तातडीने कामाला लावण्यात आले आहे. या पथकाद्वारे आता रस्त्यांवर अयोग्य पद्धतीने उभ्या असलेल्या वाहनांवर थेट दंडात्मक कारवाई केली जाणार असून, वाहन मालकाला प्रत्येकी ₹2000 दंड आकारण्यात येणार आहे. महापालिकेचे कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी यांनी स्पष्ट केले की, वाहनधारकांनी नियमाचे पालन करून वाहने उभी करावीत, अन्यथा अशा कारवाईला सामोरे जावे लागेल

## विष्णुनगर ता. निफाड येथे मध्यरात्री अज्ञात चोरट्यांकडून दोन घरफोड्या


### परिसरात भीतीचे वातावरण ग्रामस्थांनी सावध राहण्याचा तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर** : – विष्णुनगर येथे मध्यरात्री एक ते चार च्या सुमारास दोन ते तीन अज्ञात चोरट्यांकडून दोन घरांचे दरवाज्याचे कडी तोडून घरात प्रवेश केला प्रथमता अण्णा वामन घायाळ यांच्या घराचा पाठीमागचा दरवाजाचा तोडून घरात प्रवेश केला कपाटाचे कुलूप तोडून कपाटातून पंधरा हजार रुपये रोख व चांदीच्या तोळबंद्या सोन्याचे ओमपान, अंगठी व कानातील रिंगा असे चोरट्यांनी लंपास केले व त्यानंतर शिवाजी बंडू घायाळ यांच्या घराचा दरवाजातून घरात प्रवेश केला व तेथील चार हजार रुपये लंपास करून पोबारा केला त्यानंतर सकाळी सर्व प्रकार उघडकीस आला सहाय्यक निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार कांदाळकर घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून पुढील तपास करत आहेत







**तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले**

आमच्या गावातील आण्णा वामन घायाळ व शिवाजी बंडू घायाळ यांच्या घराचे दरवाजे तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करून पैसे व दागिने लंपास केले तरी परिसरातील नागरिकांनी घाबरून न जाता कुणाला काही आढळल्यास व कोणावर कुठलीही शंका आल्यास संपर्क साधावा सर्व विष्णुनगर ग्रामस्थ तुमच्यासोबत असल्याचेही आवर्जून सांगितले व सर्व विष्णुनगर ग्रामस्थांनी लग्नानिमित्त बाहेरगावी सर्व जाऊ नये व रात्री जागसुध झोपावे असे आवाहन तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले यांनी केले आहे

## खांदेश्वर पोलिसांतर्फे नाकाबंदी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी सायंकाळी पोलिसां तर्फे कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. सर्वत्र सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांतर्फे कोंबिंग ऑपरेशन,नाकाबंदी राबविण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर पोलिसांतर्फे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन दरम्यान नागरिकांची तपासणी करण्यात आली. आदई सर्कल आणि एअरटेल गॅलरी जवळ नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार या कोंबिंग ऑपरेशनमध्ये सहभागी झाले आहेत.





## पळसदरी ग्रामपंचायत आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**कर्जत वार्ताहर**




पावसाळा जवळ आला असून आपण सर्वजण डोंगर माथ्यावर राहता घरातून कामाच्या ठिकाणी शाळा कॉलेज मध्ये जाता येता कधीही आपल्यावर नैसर्गिक आपत्ती अथवा आपल्या आपल्या चुकीने आपत्या येऊ शकतात यासाठी सामोरे जाण्यास प्रत्येकाने दक्ष सतर्क राहिले पाहिजे यासाठी रायगड जिल्हा परिषदेतर्फे अनेक ग्रामपंचायतीमध्ये आपत्ती सुरक्षा चे मार्गदर्शन करणारे जागतिक कीर्तीचे तज्ञ डॉ. जयपाल पाटील यांना आपल्या पंचायतीने बोलावले असून ते जे माहिती आपणास देतील त्याचा लाभ आपण व इतरांनाही द्यावा असे कार्यशाळेचे उद्घाटनिय भाषणात कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. सुशील पाटील यांनी केले. यावेळी व्यासपीठावर गटविकास अधिकारी सुशील पाटील, रायगड भूषण डॉ. जयपाल पाटील ग्रामपंचायत प्रशासिका ढमढेरे मॅडम, एडवोकेट गोपाळ शेळके श्री राजपूत विस्तार अधिकारी डॉक्टर प्रीती करवंदे एडवोकेट प्रवीण सुर्वे, ग्रामपंचायत माजी उपसरपंच एडवोकेट, श्री रविकिरण पाटील पशुसंवर्धन अधिकारी कर्जत श्रीयुत हिरे फायर अधिकारी कर्जत नगर परिषद श्री. अनिल राठोड ग्रामविकास अधिकारी, श्री. जयेंद्र देशमुख माजी सरपंच, श्री.वसंत महाडिक,कर्जत तालुका अध्यक्ष भाजपा, एडवोकेट सचिन दरेकर, पोलीस पाटील श्रीमती विजया खोपकर आदी मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले, गटविकास अधिकारी व प्रशासिका यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पशुसंवर्धन अधिकारी श्री. रविकिरण पाटील यांनी गाई गुरांवर येणाऱ्या रोगाच्या आपत्तीबाबत सामोरे जायचे याची माहिती देऊन शेतकऱ्यांसाठी आलेल्या शासनाच्या नवीन योजनांची माहिती दिली. आपल्या मुली आणि महिलांच्या बाळंतपणे घरामध्ये न करता, लग्नासाठी योग्य वय झाल्यावरच आपल्या मुलींची लग्न करावी बाळंतपणासाठी महाराष्ट्र शासनाच्या 102 रुग्णवाहिकच बोलावून सरकारी रुग्णालयातच बाळंतपणाचा मुलींना पाठवावे ते मोफत असून त्यासाठी आमची यंत्रणा सदैव तत्पर आहे असे मार्गदर्शन डॉक्टर प्रीती करवंदे यांनी केले, अशी घरामध्ये आपत्ती आल्यास डॉ. जयपाल पाटील यांनी फोन द्वारे माहिती दिल्याने माझ्यासोबत परिचारिका श्रीमती अंकिता भोईर वाहन चालक श्री जितेंद्र काळोखे उपस्थित राहिले.यावेळी डॉ. जयपाल पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की सध्या पावसाळा सुरू झाला असून यावेळी विजा कोसळून अनेक दुर्घटना घडतात यासाठी केंद्र सरकारने आपल्या जवळ कायम वापरत असलेल्या मोबाईलवर दामिनी अप्स डाऊनलोड करून घ्या ज्यामुळे आपल्यापासून किती दूर अंतरावर वीज पडणार आहे याची माहिती मिळते आणि आपण सुरक्षित राहतो, आपण सर्वजण डोंगरकड्यावर राहता यासाठी वेळोवेळी तहसील कार्यालयाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन काटेकोरपणे करावे, महिलांनी घरामध्ये वापरत असलेल्या गॅसचा व त्याच्या नळीचा सुरक्षित वापर कसा करावा, साप व विंचू दंशाच्या वेळी कशी काळजी घ्यावी, डोंगर माथ्यावरून ज्येष्ठ नागरिक आजारी, बाळंतपणासाठी महिलेला जेथे 102 रुग्णवाहिका व अडचणीच्या वेळी आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी असणारी 108 रुग्णवाहिकेमध्ये घरातील चादरी मध्ये व हाताच्या घडीचा गणपती करून कसे न्यावयाचे याचे प्रत्यक्ष करून दाखविले, गावातील घरांना अथवा गाईगुरांच्या गोठाला आग लागली तर कर्जत तहसीलदार अथवा कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना दूरध्वनीद्वारे माहिती देणे. त्यावेळी प्रात्यक्षिकासाठी येथीलगाई गुरांच्या गोठ्याला आग लागली असे कर्जतचे प्रांताधिकारी श्री. प्रकाश संकपाळ यांना दूरध्वनी करताच 20व्या मिनिटात आगीचा बंब फायर अधिकारी श्री. दिनेश हिरे व त्यांचे सहकारी श्री. भरत भोईर,श्री. मारुती रोकडे श्री. आकाश परदेशी, आपल्या साहित्यसहित उपस्थित राहिले.यावेळी भारत सरकारने महिलांच्या सुरक्षेसाठी केलेले नवीन 4 कायद्यांची माहिती रायगडचा युवक फाउंडेशनचे सदस्य एडवोकेट गोपाळ शेळके यांनी दिली. त्याचबरोबर आमच्या कार्यशाळेची माहिती आपल्या समाजाच्या इतर बांधवांना पण द्यावी असे आपल्या मार्गदर्शनात समाजसेवक, निवृत्त रेल्वे कर्मचारीश्री. पिरकड यांनी सांगितले. यावेळी महिलांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलिसांचा 112 क्रमांक कसा वापरायचा याबद्दलची माहिती देताना कर्जत पोलीस ठाण्यात फोन लावता प्रमुख पोलीस निरीक्षक यांनी त्या विभागाचे बीट अंमलदार श्री. पावरा यांना पाठवून त्यांनी 112 क्रमांकांची मशीन दाखवून माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विकास रणपिसे आपत्ती सुरक्षा मित्र, पळसदरी ग्रामपंचायत कर्मचारी श्री. नामदेव मोरे, श्री. निलेश आखाडे श्री. गोविंद गोरे यांनी खूप परिश्रम घेतले शेवटी ग्रामविकास अधिकारी श्री. अनिल राठोड यांनी आभार मानले.

## गुरुवर्य बाळाराम पाटील विद्यालयाचे दैदिप्यमान यश; शिक्षणातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांची मेहनत आणि संस्थेचा दूरदृष्टीकोन यांचे उत्तम फलित

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**




विद्या वर्धिनी संस्था संचलित गुरुवर्य बाळाराम पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, दारावे, नेरुळ या शैक्षणिक संकुलाने यंदाच्या शैक्षणिक वर्षात (2024–2025) उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेच्या गुणवत्तेची आणि व्यवस्थापनाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे हे यश, विद्यार्थ्यांच्या मेहनतीने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने घडवले गेले आहे.

**निकालात ठसा उमटवणारे यश,**

यंदा दहावी आणि बारावीच्या सर्व विभागांनी उत्तुंग यशाची नोंद केली आहे.१०वी मराठी माध्यमाचा निकाल ७५ टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत यश संपादन केले आहे.१०वी इंग्रजी माध्यमाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होणे ही शाळेच्या शैक्षणिक दर्जाची साक्ष आहे.१२वी (कॉमर्स विभागाचा) निकाल ९० टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी पात्रता मिळवली आहे.प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थ्यांचा ठसा,प्राथमिक मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. ही परीक्षा केवळ शालेय अभ्यासक्रमापुरती मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या विश्लेषण क्षमता, तर्कशक्ती आणि सर्जनशीलतेची परीक्षा घेणारी असते. अशा परीक्षेत मिळालेले यश हे शाळेतील शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची तयारी दर्शवते.अध्यक्ष मा. सुनील पाटील यांचे गौरवोद्गार संस्थेचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक मा. सुनील पाटील यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे विशेष कौतुक केले. “विद्यार्थ्यांचे यश हे केवळ गुणांचे नसून, त्यांच्या मेहनतीचे आणि शाळेतील प्रत्येक शिक्षकाच्या समर्पणाचे फलित आहे. पालकांनी शाळेवर ठेवलेला विश्वासही यामध्ये तितकाच महत्त्वाचा आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो,” असे त्यांनी सांगितले.संस्थेचे शिक्षणाबाबतचे मूल्यधार्जिण धोरण विद्या वर्धिनी संस्था केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य, सामाजिक भान, नेतृत्वगुण, आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यावर भर देते. शिक्षण हे परीक्षेपुरते न ठेवता, विद्यार्थ्यांना आयुष्यासाठी सज्ज करण्याचे काम संस्था सातत्याने करत आहे.शिक्षकवृंदांचा अथक पाठिंबा,या यशामागे शाळेतील शिक्षकवर्गाचे अमूल्य योगदान आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत वैयक्तिक लक्ष देत, विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन केले. कठोर परिश्रम आणि समर्पित सेवा यामुळेच आज संस्था यशाच्या शिखरावर पोहोचली आहे.सन्मान समारंभाचे आयोजन या यशाच्या निमित्ताने लवकरच एका भव्य सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात येणार असून, यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमास पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी व समाजातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले.

“गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच यशाचे खरे भांडार आहे – गुरुवर्य बाळाराम पाटील विद्यालयाने हीच शिकवण कृतीतून सिद्ध केली आहे.”

## नाले साफसफाई झाली पण घनकचरा व्यवस्थापन कोण करणार ?

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

काही दिवसापूर्वी जुना पुणे हायवेवर ओएनजीसी जवळ रेल्वे ब्रिजच्या खाली नाल्याची साफसफाई केली होती.साफसफाई करून बाजूला रस्त्याच्या कडेला घनकचरा लावून गेले तीन ते चार दिवस पडून आहे.त्यामुळे या रस्त्यावर वाहन चालकांना त्रास होत आहे तसेच या घनकचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. सध्या अवकाळी पाऊस पडत आहे.त्यामुळे पुन्हा हा कचरा त्याच नाल्यात जात असल्यामुळे पुन्हा ही साफसफाई करावी लागणार आहे त्यामुळे नागरिकांना व वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तरी आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीने नाले साफसफाई केली पण हा कचरा अजून उचलला नाही त्यामुळे हा कचरा लवकरात लवकर उचलावा अशी मागणी नागरिकाकडून होत आहे. याकडे प्रशासनाने तात्पर्य दाखवून लक्ष देण्याची गरज आहे.



# गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद येथे आज दिनांक14/05/2025 रोज बुध वार ला एस एस सी 2025 बोर्ड परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासमवेत कौतुक सोहळा मा. श्री प्रदीपरावजी देशमुख व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव स्व. एडवोकेट आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.



श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद मध्ये वर्ग 10वी बोर्ड परीक्षेला एकूण 158 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते प्राविण्यश्रेणीत 108 विद्यार्थी उत्तीर्ण झाले व उर्वरित विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयाच्या निकालाची टक्केवारी 96.83%आहे.विद्यालयातून प्रथम अथर्व दिपकराव देशमुख 91.20%द्वितीय कु.शिवानी गजानन घुगे 89.20%तृतीय क्रमांक कु. पूनम मदन मापारी 88.00%गुण मिळवत उत्तीर्ण झाली . प्रास्ताविकातून प्राचार्य सुभाष उमाळे सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम ठेवली असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री प्रदीपरावजी देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या गुणांचे कौतुक करून पुढील शिक्षणामध्ये शाळेचे नावलौकिक वाढवा व आपल्या पालकांचे नाव रोशन करा असे बोलून विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून आभार व्यक्त केले व विद्यालयाच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाला उपस्थित मा. प्रदीपरावजी देशमुख, प्राचार्य सुभाष उमाळे, पोलीस पाटील घुगे साहेब, डॉ. मुळे साहेब, पर्यवेक्षिका वर्षाताई देशमुख, प्रा. शिवाजीराव देशमुख, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक ,प्राध्यापक, प्राध्यापिका,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गजानन ओव्हर यांनी केले.व आभार वर्षाताई देशमुख यांनी मानले.

## जीवन आनंद



जीवनातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद.गमतीची गोष्ट अशी की मौल्यवान असूनही परमेश्वराने आपल्याला ती विनामूल्य दिली आहे. पण त्यामुळे गमतीची गोष्ट अशी की आपल्यापैकी बऱ्याच लोकांना जीवन संपेपर्यंत त्याचा पत्ताच लागलेला नसतो. उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा.दिवस मावळताना तो तुम्हाला खूप समाधान देऊन जातो. आनंद हा फुलपाखरासारखा असतो त्याचा पाठलाग केला की तो दूर पळतो. व आपण निवांत बसलो की अलगद आपल्या खांद्यावर येऊन बसतो. आकाशाला गवसणी घालणाऱ्या गरुडाला पाण्याच्या एका थेंबासाठी खाली यावेच लागते.खाली येणे म्हणजे त्याची हार नसते तर ती एक उंच भरारीची सुरुवात असते त्याला जेव्हा पाणी मिळते तेव्हा त्याचा तो आनंद बघण्यासारखा असतो. आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. आनंदही एक अनुभूती आहे ती चेहऱ्यावर दिसते. समोरचा चेहरा पाहून आपल्याला कळतं की तो आनंदी आहे का दुःखी आहे. जीवनाचा आनंद घ्या,आनंद द्या आणि पसरवा. आपल्या आजूबाजूला आनंदाचे वातावरण असेल तर आपण दुःखी होऊ शकत नाही हे एक लक्षात ठेवा. त्यामुळे आनंदाचे जीवन जगावे. आनंदाची उधळण दाही दिशात करावी. आनंदाची बरसात जनमानसात करावी. दुःखाला सुद्धा आनंदाने सामोरे जावे. कठीण असते पण करावे तर लागते.संकटांना धीराने तोंड द्यावे. आपला आनंद आपल्या कृतीतून दिसला पाहिजे. समोरच्या माणसाच्या चेहऱ्यावर दिसला पाहिजे. तर आनंदाने जग जिंकलं असं आपण म्हणू शकतो.

**वसुधा नाईक, पुणे**
**मो. नं. 9823582116**

## सलूनच्या दुकानात पाच वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कार... महाड तालुक्यातील धक्कादायक घटना समोर...

**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**रायगड :-** महाड तालुक्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीत वाढ होताना दिसत आहे, नातीच्या वयाच्या मुलीला देखील नराधम वासनेचे शिकार बनवित आहेत अशा नराधमांना ताबडतोब फाशीची शिक्षा दिल्यास कुठेतरी अशा निच प्रवृत्तीच्या नराधमांना आळा बसेल, पाच वर्षांच्या चिमुकलीला खाऊला पैसे देतो असे आमिष दाखवून सलूनच्या दुकानात नराधम आरोपी बोलावून घेतो आणि आपली वासनेची भुक मिटवतो.. ज्यावेळी पिडीत मुलगी घडलेल्या् घटनेची माहिती आपल्या आईला सांगते त्यावेळी त्या मातेच्या हृदयाचे पाणी पाणी होऊन ती माऊली एकच हांबरडा फोडते. महाड तालुक्यातील ऐश्वर्या हेअर कटिंग सलून मध्ये हा घाणेरडा प्रकार





घडला असून सलून चालविणारा विलास पांडुरंग हुलालकर .वय वर्षे अंदाजे ५० या आरोपीला पोलीसांनी अटक केले आहे,या गुन्हाचा तपास पोलीसांकडून कसोशीने सुरू असला तरी अशा नराधम आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे आरोपी विरोधात बलात्कार व पॉक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून महाड उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे व पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हि. राऊत या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत...

# कर्जवाटप न झाल्यास 'मुक्काम पोस्ट' आंदोलनाचा इशारा – वंचित बहुजन आघाडीचे अग्रणी बँकेला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

यवतमाळ:-खरीप हंगाम २०२५ तोंडावर येऊन ठेपला असतानाही जिल्ह्यातील पीककर्ज वाटपाची टक्केवारी अत्यंत अल्प असून, यामुळे हजारो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने आज दिनांक १५ मे (गुरुवार) रोजी अग्रणी बँक व्यवस्थापक,यवतमाळ यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात बँकांच्या कर्जवाटपातील उदासीनतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून, येत्या आठ दिवसांमध्ये जर



**उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते:**
डॉ.नीरज वाघमारे (जिल्हाध्यक्ष),शिवदास कांबळे (जिल्हा महासचिव),मीना रणीत (महिला उपाध्यक्ष),शैलेश भानवे,विलास वाघमारे,उत्तमराव कांबळे,संगीता भवरे,प्रा.अमित भगत,पलाश सिरसाट,अमन राऊत,निलेश मनवर,सागर डोने,आदित्य भवरे,केतन रणखांब इत्यादी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.
**"शेतकऱ्यांच्या संघर्षात वंचित बहुजन आघाडी ठामपणे उभी आहे !"**
**– डॉ.नीरज वाघमारे,जिल्हाध्यक्ष**

अपेक्षित कार्यवाही न झाल्यास वंचित बहुजन आघाडी डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात 'मुक्काम पोस्ट आंदोलन' छेडणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. यावर्षी यवतमाळ जिल्ह्यातील १९ बँकांच्या २७७ शाखांना एकूण ₹ २२०० कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले असले तरी, १३ मे २०२५ पर्यंत केवळ ₹३९६.७८कोटी (१८.०४%) इतकेच कर्जवाटप झाले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून खरीप हंगामाच्या तयारीसाठी गरजेचे असलेले बी-बियाणे, खते, औषधे, मशागत यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक भांडवल उपलब्ध होत नाहीये.

बँकनिहाय कर्जवाटपाची स्थिती:---
राष्ट्रीयीकृत बँका (१३१ शाखा): ₹११८१.५०कोटी टार्गेट – केवळ ₹१६०.५४कोटी वाटप (१३.५९%)
खासगी बँका (२६शाखा): ₹१५३.५०कोटी टार्गेट – फक्त ₹९.४३कोटी वाटप (६.१५%)
विदर्भ-कोकण ग्रामीण बँक (२६ शाखा): ₹१९५ कोटी टार्गेट – ₹५६.७७कोटी वाटप (२९.१२%)
जिल्हा मध्यवर्ती बँक (९४शाखा): ₹६७० कोटी टार्गेट – ₹१७०.०२कोटी वाटप (२५.३८%) – सर्वाधिक प्रगती.

वंचित बहुजन आघाडीच्या मागण्या:--
बँकर्स कमिटीची तात्काळ बैठक बोलवावी. अपयशी ठरलेल्या बँक शाखांवर कारवाई करावी. पात्र शेतकऱ्यांना नवीन कर्ज मंजुरीसाठी प्रक्रिया सुलभ करावी. थकीत कर्जदारांसाठी सवलतीची योजना जाहीर करावी. आठवड्याला पीककर्ज वाटपाचा अहवाल जाहीर करण्यात यावा. सर्व शाखांनी पात्र खातेदारांची यादी तयार करून त्यावर त्वरित कारवाई करावी.

**मुक्काम पोस्ट आंदोलनाचा इशारा:---**
यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हक्क अबाधित राहावेत,खरीप हंगाम सुरळीत पार पडावा यासाठी जर पुढील आठवडाभरात बँकांनी योग्य कार्यवाही केली नाही,तर वंचित बहुजन आघाडी अग्रणी बँक कार्यालयात 'मुक्काम पोस्ट आंदोलन' छेडेल,असा ठाम इशारा जिल्हाध्यक्ष डॉ.नीरज वाघमारे यांनी दिला.

## खराडे फाट्यावरील साई मंदिर चौकातील प्रवासी पिक अप शेड जवळपास २ वर्षापासून प्रलंबित

### चौकाचे रुंदीकरण आणि सुशोभीकरण होऊनसुद्धा पिक अप शेड तयार केले नाही प्रवाश्यांना नाहक त्रास

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी विशाल जाधव**



खराडे फाट्यावरील साई मंदिर चौकाचे मागील जवळपास २ वर्षापूर्वी रुंदीकरण आणि सुशोभीकरण करण्यात आले या अगोदर या चौकात प्रवाश्यांना पिक अप शेड ची व्यवस्था होती महत्त्वाचे म्हणजे याच चौकात न्यू इंग्लिश स्कूल खराडे आहे शाळेमुळे विविध गावातील विद्यार्थ्यांची रहदारी असते याचसोबत नोकरदार वर्ग,वयोवृध्द नागरिक तसेच प्रवासी प्रवास करत असतात. वारंवार पाठपुरावा करून सुद्धा अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे जाणवून आले भविष्यात जर याच ठिकाणी काही गंभीर घटना घडली तर त्याला जबाबदार कोण? पिक अप शेड नसल्यामुळे ऊन,वारा,पाऊस यांचा त्रास मुलांना तसेच प्रवाश्यांना करावा लागत आहे प्रवासी तसेच उभे असताना दिसून आले आहेत. प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी बोलताना ग्रामस्थांच्या आणि नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया पाहण्यात आल्या.या चौकात प्रवासी पिक अप शेड कधी होणार याच प्रतिक्षेत येथील ग्रामस्थ आणि नागरिक आहेत.

# कृषी सहाय्यकांचा बेमुदत कामबंद आंदोलनास सुरुवात; खरीप हंगामात कार्यात अडथळा

**दैनिक युवका आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर (ता. निफाड)** – कृषी विभागाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याने अखेर महाराष्ट्रातील 11,500 कृषी सहाय्यकांनी आजपासून (15 मे) बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केलं आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर सुरू झालेल्या या आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. कृषी सहाय्यक हे विभागाचे खरे कार्यवाहक असून ते थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन, शासकीय योजना, तांत्रिक माहिती आणि निविष्ठांचे वितरण यासारखी महत्त्वाची कामं पार पाडतात. मात्र, माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही शासनाकडून त्यांना अद्याप लॅपटॉप उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. तसेच चार-पाच गावांची जबाबदारी सांभाळणाऱ्या सहाय्यकांना अद्याप मदतनीसही मिळालेला नाही, अशी तीव्र नाराजी संघटनेने व्यक्त केली.

प्रमुख मागण्या:
'समान काम, समान वेतन' या तत्त्वावर कृषी सेवकांना नियमित करावे.
कृषी पर्यवेक्षकांची पदसंख्या वाढवून पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.





पदनामात सुधारणा करावी – तलाठी, ग्रामसेवक यांच्या प्रमाणे कृषी सहाय्यकांचेही नाविन्य करणं आवश्यक.
पीक नुकसानीच्या पंचनाम्यांमध्ये महसूल, ग्रामविकास व कृषी विभागातील जबाबदारीत समानता असावी.
शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्ष अंमलबजावणीत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कृषी सहाय्यक संघटनेने केला आहे. त्यामुळे राज्यभरात असंतोषाची लाट उसळली असून निफाड तालुक्यातील कृषी सहाय्यक 100 टक्के संपात सहभागी झाले आहेत. या आंदोलनाची माहिती जिल्हा उपाध्यक्ष आर. एन. साठे यांनी दिली. यावेळी जयेश निर्भवणे, सुनील सोनवणे, अमोल सोमवंशी, राजेंद्र शिंदे, निलेश ठाकरे, संतोष लोहार, जितेंद्र पोफळे, योगेश ठाकरे, रोहित निकम, छाया मोडे, श्रीमती कांबळे, श्रीमती शिरसाठ, श्रीमती विसापूरकर, श्रीमती चव्हाण, श्रीमती भड आदी कृषी सहाय्यक उपस्थित होते.

## नेहरू सायन्स सेंटर यांच्या सहकार्याने ओरियन मॉल, पनवेल येथे मुलांसाठी विज्ञान प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर** : नेहरू सायन्स सेंटर यांच्या सहकार्याने ओरियन मॉल, पनवेल येथे 25 मे 2025 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात भेट देण्यासाठी व सहभाग घेण्यासाठी आवाहन ओरियन मॉलच्या वतीने मंगेश परुळेकर व मनन परुळेकर यांनी केले आहे. हे विशेष प्रदर्शनी विज्ञान शिक्षणामध्ये जिज्ञासा वाढवण्यासाठी आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमाचा एक भाग आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी हे प्रदर्शन म्हणजे विज्ञानाच्या मनोरंजक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी सादरीकरणाचा अनुभव घेण्याची एक अनोखी संधी आहे.



नेहरू सायन्स सेंटर दीर्घकाळापासून प्रत्यक्ष प्रयोग, संवादात्मक मॉडेल्स आणि कार्यशाळांच्या माध्यमातून विज्ञान व तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत सहज व प्रभावी पद्धतीने पोहोचवत आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी थरारक लाइव्ह प्रयोग व सहभागी होण्याची संधी सुद्धा उपलब्ध आहे. तसेच मुलांसाठी, शिक्षकांसाठी आणि पालकांसाठी मार्गदर्शक कार्यशाळा आहे. त्याचप्रमाणे विज्ञान समजून घेण्यास मदत करणाऱ्या नवकल्पनांचा अनुभव येथे मिळणार आहे. त्यामुळे हा अनुभव विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्टीला अर्थपूर्ण बनवेल आणि त्यांच्यात विज्ञान व तंत्रज्ञानाविषयी दीर्घकालीन रुची निर्माण करेल. तरी उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनात सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रशासकीय अधिकारी पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचे सल्ले देऊ लागले...

### कुंपनच शेत खाऊ लागले, पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांचा गंभीर आरोप :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पवनचक्की कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत, शेतकरी प्रशासनाकडे तक्रारी करत आहेत. मात्र त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून कंपन्यांनी पाळलेल्या गुंडासह सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांच्या शेतातुन विनापरवाना व कोणताही मावेजा न देताच खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत आहेत. महसुल व पोलीस प्रशासन त्यांचे पगार पवनचक्की कंपन्या करत असल्यागत गुलाम होऊन पवनचक्की कंपन्यांना अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन नियमबाह्य मदत करत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यातच गंभीर बाब म्हणजे पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार हे पवनचक्की कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी कामास आडकाठी केली तर त्यांच्या वर खंडणीचे गुन्हे दाखल करा पुढचं आम्ही पाहुन घेऊ असं खुलेआम शेतकऱ्यांसमोर म्हणून पवनचक्की कंपन्यांच्या मुजोरीला बळ देत असल्याचा गंभीर आरोप अशोक कोटुळे, दासु बोराडे, चंदु बोराडे, बापु बोराडे, लक्ष्मण कोटुळे, अनिकेत जाधव व ईतर शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना केला आहे. या विषयी सविस्तर माहिती अशी की पाटोदा तालुक्यातील जवळाला शिवारातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान करून पवनचक्की कंपन्यांच्या गाड्या जात असल्याची तक्रार आठवडाभरापुर्वी प्रशासनाकडे केली होती. मात्र त्या तक्रारीची दखल घेतली नाही. उलट कंपन्यांच्या गाड्यांना जाण्यासाठी रस्ता मोकळा करून देण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासन घटनास्थळी पोहोचले. गाड्या सुरळीत मार्गी लावण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी नायब तहसीलदार दहिफळे यांना घटनास्थळी पाठवले. शेतकऱ्यांची बाजु प्रशासनाने ऐकून घेतलीच नाही. पोलिस बंदोबस्त आणि पवनचक्की कंपन्यांचे कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना अगदी घेराव घालून गाड्या मार्गस्थ केल्याचे शेतकरी कोटुळे यांनी सांगितले. याच वेळी प्रशासनाचा एक माणूस आणि ईतर कंपनीचे कर्मचारी एकत्र येऊन शेतकऱ्यांना न विचारताच खुणा करत होते. उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी जर कामात कोणी आडवे आले तर त्यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करा असा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे





**कुंपनच शेत खाऊ लागले ; प्रशासकीय अधिकारीच पवनचक्की कंपन्यांना खंडणीचे गुन्हे दाखल करायचे सल्ले देऊ लागले तर शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागायची ?**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समितीची स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे. तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांची निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाकडे प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतमालक, शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्या मध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याच प्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तहसीलदार सचिव आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव दुर्लक्ष होत आहे. आता तर संनियंत्रण समितीचे अध्यक्ष आणि सचिवच शेतकऱ्यांचे ऐकुन न घेता पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचा सल्ला देत असल्याचा आरोप शेतकरी करत असतील तर कुंपनच शेत खात असुन शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागायची?? असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**सामाजिक कार्यकर्ते**


## स्कूल ऑफ ब्रिलीयंट राळेगाव(सी.बी.एस.ई) शाळेचा उत्कृष्ट निकाल

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगाव:-स्कुल ऑफ ब्रिलीयंट राळेगाव(सी.बी.एस.ई) इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यंदाही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शाळेची शान वाढवली आहे. या निकालात तनुश्री ढूमणे(९३%) घेऊन प्रथम तर,संस्कृती बंडेवार (९०.६०%) द्वितीय तर तृतीय क्रमांक आर्या येपारी(८८.८०%)







आणि चतुर्थ क्रमांक देव्यानी ओंकार (८८.४०%), संबोधी लोहकरे (८७%),अश्लेशा नागभीडकर(८६.८०%),वैदही तलांजे(८५.४०%) शर्वरी येलेकर(८४%),निनाद केवटे(८३.२०%),मुगीस अली(८१.८०%) विद्यार्थ्यांनी चांगली टक्केवारी मिळवित यश संपादन केले आहे.शाळेचे अध्यक्ष पेंन्टना चिप्पावार, शिक्षण सल्लागार रमेश चिप्पावार,व्यवस्थापक अनवर अली, तसेच शिक्षकवृंद कुलदीप वाघमारे,सतिश काकडे,महेश दैवलकर,अमर बातुलवार,उमेश खैरे,मोरेश्वर ठाकरे,मनिषा पोटे,उज्वला धुर्वे व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.स्कुल ऑफ ब्रिलीयंट शाळेचा यावर्षी उत्कृष्ट निकाल ठरला असून राळेगाव परिसरामध्ये आनंदाची लाट पसरली आहे.

## निवडक

### एमजीएम विद्यापीठात बुद्ध पौर्णिमेचा सोहळा

**छत्रपती संभाजीनगर :** ज्यांनी राग-द्वेष-मोहावर विजय प्राप्त करून जगाला परिशुद्ध जीवनाची अनुभूती दिली त्या भगवान गौतम बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तीनही घटनांची साक्ष असलेल्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'पारमितांचा घाट' ही एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली विशेष संगीत मैफल मोठ्या थाटात आणि श्रोत्यांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाली. विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न झालेल्या या संगीत मैफलीचे उद्घाटन पोलीस उपायुक्त नितीन बगाटे ( भा. पो. से. ) यांच्या हस्ते झाले.

### सैनिक कल्याण निधीमध्ये उद्योजकांचा सहभाग



**इचलकरंजी :** शहरातील युवा उद्योजक प्रदीप धुत्रे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक भान जपत प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. नुकत्याच 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत लष्कराच्या यशस्वी कारवाईनंतर आणि शहीद झालेल्या जवानांच्या सन्मानार्थ त्यांनी सैनिक कल्याण निधीमध्ये रु. ३३,३३३/- इतकी रक्कम योगदान स्वरूपात दिली आहे. ही रक्कम बुधवारी इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांच्याकडे अधिकृतपणे धनादेशाद्वारे सुपूर्त करण्यात आली. पुढे ही रक्कम जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे पोहचविण्यात येणार आहे.

### नवी मुंबईत गणेशविद्या महायज्ञाचे आयोजन



**नवी मुंबई :** भारताच्या सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीतून भारताचे रक्षण व्हावे आणि भारताला विश्वगुरू बनण्याचा मार्ग सुकर व्हावा, यासाठी अंतर योग फाऊंडेशनतर्फे आयोजित भव्य 'गणेश विद्या महायज्ञ' सोहळ्याचे आयोजन रविवारी नवी मुंबई येथे आचार्य उपेन्द्र यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले. सध्याच्या परिस्थितीचे संकेत दोन वर्षांपूर्वीच मिळणे सुरू झाले होते, मात्र त्यासाठी योग्य ते अध्यात्मिक उपचार पार पाडले गेले आणि त्यातून भारत सामर्थ्यशाली होईल हे पाहिले गेले, असे उद्गार यावेळी आचार्य उपेन्द्र यांनी काढले.

# यावल, फणसाड वन विभागाची प्राणी गणना यशस्वी

बुद्ध पौर्णिमानिमित्ताने यावल प्रादेशिक वन विभाग तसेच मुरूड-जंजिरा येथील फणसाड अभयारण्यामार्फत प्राण्यांची तसेच पक्ष्यांची गणना यशस्वीरित्या करण्यात आली. यावल प्रादेशिक वन विभागामार्फत ३९ मचाण तयार करण्यात आले होते. तर मुरुडमधील फणसाड अभयारण्यात १३ ठिकाणी लाकडी मचाण बांधण्यात आले होते. स्थानिक नागरिकांसह पर्यटकांना निसर्गाचा अनुभव घेता यावा, हाच मुख्य उद्दिष्ट ठेवत पक्षी, प्राण्यांची गणना करण्याचा हेतू असल्याचे सांगितले जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा ही बुद्ध पौर्णिमेला पक्षी, प्राण्यांची गणना वन्य प्राण्याला न त्रास देता वन कर्मचारी तसेच लोकांमार्फत करण्यात आली.





## ४९२ विविध पक्ष्यांची नोंद

**विजय पाठक /जळगाव**

बुद्ध पौर्णिमा निमित्ताने रात्री यावल प्रादेशिक वन विभागात ३९ मचाणांवर बसून करण्यात आलेल्या वन्यप्राणी गणनेत एकूण ४९२ वन्यप्राणी तसेच पक्ष्यांची नोंद करण्यात आली असल्याची माहिती यावल वन विभागाचे उपवन संरक्षक जमीर शेख यांनी दै. नवशक्तिशी बोलतांना दिली.

६३ हजार हेक्टरमध्ये सातपुड्यात यावल प्रादेशिक वन विभाग पसरलेला असून या विभागात विविध दुर्मिळ वृक्ष वनस्पती आणि मोठ्या प्रमाणावर वन्यप्राणी आहेत. बुद्ध पौर्णिमेच्या रात्री सोमवारी या वन विभागात वन्यप्राणी गणनेसाठी विविध ठिकाणी ३९ मचाण उभारण्यात आले होते.


बुद्ध पौर्णिमा निमित्ताने निसर्ग प्रेमी व पर्यावरण प्रेमी यांना देखील प्राणी निरीक्षण व गणनेत सहभागी होण्याची विनंती केली होती. यास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक महाविद्यालयीन विद्यार्थी वन्यजीव अभ्यासक असे १५० हून अधिक जणांनी त्यात सहभाग नोंदवला होता. या गणनेमध्ये सहभाग घेतलेल्या पर्यटकांना तसेच स्थानिकांनी आनंद व्यक्त केला. सहाय्यक वनसंरक्षक प्रथमेश हाडपे, समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही गणना करण्यात आली.


### २७ हून अधिक प्रजातींची नोंद

रात्रभर प्राणी निरीक्षण व गणना करीत असतांना प्रमुख्याने बिवट, अस्वल, कोल्हा, लांडगा, रानडुक्कर, तडस, मोर चिंकारा, चौशिंगा, काळवीट, वटवाघूळ, ससा, भेकर वनगाय, सातभाई, बुलबुल रॉबिन,किंगफिशर, अजगर अशा २७ हून अधिक वन्यजीवांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली.


> यावल प्रादेशिक वनविभागाच्या रावेर वन विभागात यंदा बिबट्याचे दर्शन घडले. गेल्या वर्षी वाघाचे दर्शन, त्याच्या अस्तित्वाच्या पाऊल खुणा आढळल्या होत्या, तशा यंदा आढळल्या नाहीत. यावल वन विभागातील जंगल हे नेहमीच पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र राहीले आहे. घनदाट जंगलातून जातांना केवळ समृद्ध वनांचे दर्शन न घडता त्यात अधिवास करणारे विविध पशु, प्राणी व निसर्गसंपदा या वन विभागात दिसून येते.
>
> **- जमीर शेख,**
> संरक्षक यावल उपवन







### रानरातवा पक्ष्याची तीन ठिकाणी अंडी आढळली



या अभयारण्यात १९ प्रकारचे वन्यप्राणी आढळतात. यामध्ये बिबट्या, सांबर, भेकरे, डुक्कर, षेकरु, पिसोरी, ससा, कालामांजर, रानमांजर, जवादा, सालिंदर, मुंगा, वानर, मोर, रान कुत्रा, गवा, गिधाड आदी प्राण्यांचे वास्तव्य आहे. तसेच १९० प्रकारचे रंगी-बेरंगी पक्षी,१३० प्रकारची फुलपाखरे या मध्ये ब्लु मॉरमॉन, मॅप व आदी फुलपाखरु आढळून येतात. या गणनेमध्ये प्राणी- सांबर, रान डुक्कर, बिबट्या, रानगवे रानमांजर इत्यादी. पक्षी- बगळे, घुबड, वटवाघूळ, मोर, रान कोंबडा, रानरातवा, पाणकावळा, तिबोटी खंड्या, नवरंग लहान निळा खंड्या, हरियाल,राखी कोतवाल, मलबार धनेश, शामा, बेडुक तोंड्या, रानपिंगळा, सातभाई, दयाल, स्वर्गीय नर्तक निळा माशीमार हळद्या सुतार पक्षी आढळून आला. तर सरपटणारे प्राण्यांमध्ये हिरवा चापडा, धिवड यांचा समावेश होता. रानरातवा पक्ष्याची तीन ठिकाणी अंडी देखील आढळून आली. बेडूक यांची नोंद फणसाड अभयारण्यातील वन विभागाचे कर्मचारी पक्षी प्रेमी व पर्यटकांनी केली.



## बिबटे व रानगवांच्या संख्येत वाढ

**संजय करडे/ मुरूड-जंजिरा**



मुरूड तालुक्यातील सुपेगाव येथील सुमारे ५४ कि.मी.क्षेत्र परिसरात फणसाड अभयारण्य क्षेत्राचा विस्तार झालेला असून या अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून पक्षी -प्राण्यांची गणना करण्यात आली.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच कर्मचारी आणि मुंबई, पुणे व अलिबाग येथील आलेले पर्यटक देखील उपस्थित होते. या अभयारण्याचा विस्तार खूप मोठा आहे. येथे असलेले रानगवे हे काही ठिकाणी कळप करून राहत असल्याने पाणी पिण्याच्या ठिकाणी जरी आले नसले तरी त्यांचे वास्तव्य आजूबाजूच्या परिसरात दिसून आले आहे. बिबट्याची संख्या देखील वाढली असून येथे त्याच्या पाऊल खुणा स्पष्टपणे दिसून आलेल्या आहेत. बिबट्याला मुबलक शिकार उपलब्ध होत असल्याने जंगलाच्या गडद भागात त्याचे वास्तव्य दिसून आले आहे.

> स्थानिक नागरिकांसह पर्यटकांना निसर्गाचा अनुभव घेता यावा, हाच मुख्य उद्दिष्ट पक्षी प्राण्यांची गणनेचा आहे. दरवर्षी प्रमाणे यंदा ही बुद्ध पौर्णिमेला पक्षी, प्राण्यांची गणना मोजक्याच ठिकाणी वन्य प्राण्याला न त्रास देता जंगलातील १५ टक्के परिसरातील लोकांच्या उपस्थितीत करण्यात आली. गणनेसाठी १३ ठिकाणी लाकडी मचाण बांधण्यात आले होते. या मचाणावरून दुर्बीणव्दारे पक्षी, प्राण्यांची गणना करण्यात आली. यामध्ये सांबर, डुक्कराची छोटी पिल्ले पाणी पिण्यासाठी आलेली दिसून आली. तसेच बिबट्याने केलेली रान डुकराच्या शिकारीचे अंश दिसून आले. तसेच वेगवेगळ्या पक्ष्यांची नोंद करण्यात आली.
>
> **-नितीन ढगे,**
> वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड

# भाजप जळगाव शहर अध्यक्षपदी दीपक सूर्यवंशी

## डॉ. राधेश्याम चौधरी, चंद्रकांत बावीस्कर यांचीही निवड



**जळगाव :** भाजपने राज्यातील ५८ जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्यांची घोषणा केली असून या नियुक्तीत पक्षाबाबतची निष्ठा आणि कार्यक्षमता यांना प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे. जळगाव महानगर अध्यक्षपदी कार्यकर्त्यांच्या अपेक्षेनुसार दीपक सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर जळगाव पूर्वसाठी चंद्रकांत बावीस्कर आणि जळगाव पश्चिमसाठी डॉ. राधेश्याम चौधरी यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनंतर भाजप कार्यालयात जल्लोष करून या जल्लोष करण्यात आला.

जळगाव भाजप जिल्हाध्यक्ष निवडीवरून मोठ्या प्रमाणावर गटबाजी सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पक्षाचे वर्षानुवर्षे काम करणारे निष्ठावंत कार्यकर्ते विरुद्ध पक्षात बाहेरून आलेले कार्यकर्ते असा सामना होता. बहुसंख्य कार्यकर्त्यांचे पक्षातील निष्ठावंतांनाच संधी दिली जावी, असे मत होते. अखेर जाहीर झालेल्या या अध्यक्षपदांच्या यादीत निष्ठावंतांनीच स्थान मिळवल्याचे दिसून आले. जळगाव महानगराध्यक्ष पदासाठी १९९० पासून पक्षाशी एकनिष्ठ असलेले दीपक सूर्यवंशी यांची फेरनियुक्ती करण्यात आली. जळगाव पूर्वसाठी जामनेरचे चंद्रकांत बावीस्कर यांची तर जळगाव पश्चिमसाठी नामवंत सर्जन डॉ. राधेश्याम चौधरी यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

धुळे ग्रामीणसाठी बापू खलाणे, धुळे महानगरासाठी गजेंद्र अंपाळकर, नंदुरबार जिल्ह्यासाठी निलेश माळी यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी काळात होणाऱ्या नगरपरिषदा, महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होऊ घातल्या असून या नियुक्त केलेल्या अध्यक्षांवर निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने मोठी जबाबदारी देण्यात आलेली आहे. पक्षात प्रवेश करताच पक्षातील महत्त्वाचे पद मिळवण्याचा दुर्दैवी पायंडा पक्षात पडला असून हा थांबला पाहिजे अशी अपेक्षा कार्यकर्ते करत आहेत.

भाजपच्या या नियुक्तीवरून इतर पक्षांमध्ये धाकधुक वाढली आहे. आगामी निवडणुका पाहता भाजपने आतापासूनच तयारी सुरू केली असल्यामुळे इतर पक्ष देखील आता तयारीला लागतील.

> पक्षाने आपल्यावर जो विश्वास टाकला त्याला सार्थ करण्यासाठी व कार्यकर्त्यांच्या आकांक्षांना बळ देण्यासाठी आपण कटीबद्ध राहू.
>
> **- दीपक सूर्यवंशी**

> केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणाच्या योजना तळागाळातील,गरजू जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी संघटनेला अधिक बळकट व सक्रीय बनवण्याचा प्रयत्न करणार.
>
> **- डॉ. राधेश्याम चौधरी**

# लाडक्या बहिणीच्या आड इव्हीएम घोटाळा लपवला

## बच्चू कडू यांचा भाजप महायुतीवर हल्लाबोल

**कराड :** विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारने लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करत महिलांना आर्थिक लाभ दिला. लाडक्या बहिणींनी आम्हाला निवडणुकीत मते दिल्याचे सांगितले. मात्र, लाडकी बहीण योजनेचे बुजगावणे उभे करून सरकारने इव्हीएम घोटाळा लपवला असून त्या घोटाळ्यावर पांघरूण घातले आहे, अशी खरमरीत टीका माजी मंत्री बच्चू कडू यांनी भाजप पुरस्कृत महायुतीवर केली.

येथील शासकीय विश्रामगृहात मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष मनोज माळी, भानुदास डाईगडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बच्चू कडू म्हणाले, शेतकऱ्यांची कर्जमाफी असेल, दिव्यांग बांधवाचे मानधन असेल यांसह विविध मागण्यांसाठी बारामतीपासून आंदोलन सुरू करत आहे. सरकारचा पूर्ण अर्थसंकल्प सामान्य माणसापासून दूर गेला असल्याने याची मांडणी बारामतीत अर्थमंत्र्याच्या गावी करणार आहोत. राज्यात पैसाच नाही असे सरकार सांगत आहे. आम्ही पैसा कसा निघू शकतो त्याची मांडणी करणार आहोत. गोरगरिबांचे, शेतकऱ्यांचे रक्त सांडू नका, रक्तदान करून तरी तुमच्या सरकारला अक्कल येऊ दे, रक्तदान आंदोलन करून आम्ही याची सरकारला जाणीव करून देत आहोत.

तमिळनाडूचा अर्थसंकल्प ३ लाख कोटींचा असूनही कृषी क्षेत्रासाठी ४५ हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. मग महाराष्ट्रात असे का होत नाही? उत्तर प्रदेशसारख्या राज्याचा अर्थसंकल्प साडेआठ लाख कोटींचा आहे. तेथेही शेतकऱ्यांसाठी ४५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्राचा साडेसात लाख कोटींचा अर्थसंकल्प असूनही केवळ ९ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी दिले गेले आहेत. हा शेतकऱ्यांचा अपमान आहे, असे बच्चू कडू सांगितले.

## कंटेनरने पोलिसाला चिरडले

**पुणे :** पुणे-मुंबई महामार्गावर वडगाव तळेगाव फाटा चौकात कर्तव्यावर असणाऱ्या एका वाहतूक पोलिसाला भरधाव कंटेनरने चिरडल्याने जागीच मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी रात्री उशिरा घडली, यामुळे वडगाव मावळमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. मिथुन वसंत धेंडे (४९) असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वाहतूक पोलिसाचे नाव आहे.

वडगाव मावळ पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई बाजूकडून चाकणकडे जाणाऱ्या भरधाव कंटेनर चालकाने वाहतूक नियमन करणाऱ्या वाहतूक पोलिसाला चिरडले.

मिथुन धेंडे यांचा बुधवारी वाढदिवस होता. त्यांच्या कुटुंबीय आणि मित्र परिवाराने त्यांच्या वाढदिवसाचे नियोजन केले होते. मात्र, वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला त्यांच्यावर काळाने घाला घातला. वाढदिवसाच्या दिवशी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आल्याने मित्र परिवाराकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. धेंडे यांच्यावर त्यांच्या मूळ गावी उरुळी कांचन येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मंदिराच्या संवर्धनासह भाविकांच्या सोयीची कामे प्राधान्याने करा

### पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील करवीर निवासिनी श्री अंबाबाई व श्री क्षेत्र केदारेश्वर जोतिबा या दोन्ही मंदिरांच्या विकास आराखड्यास राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली आहे. राज्यसह संपूर्ण देशातील भाविकांचा आणि कोल्हापूर वासियांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता. यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रशासनातील सर्व यंत्रणेचे तसेच लोकप्रतिनिधींचे याबाबत त्यांनी अभिनंदन व्यक्त करून मंदिराच्या संवर्धनासह भाविकांच्या सोयीची कामे प्राधान्याने करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केल्या. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृह येथे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला.

मंदिर परिसरातील विविध भाविकांच्या सोयींमध्ये वाढ व्हावी, आवश्यक भूसंपादन प्रक्रिया तातडीने करावी, एक कालबद्ध कार्यक्रम आखून कामाला सुरुवात व्हावी या पद्धतीच्या सूचना पालकमंत्री आबिटकर यांनी या बैठकीत उपस्थितांना दिल्या.

### ४० हजार ७७२ शेतकऱ्यांचा बँक तपशील देण्यास नकार

# नांदेडमध्ये धान्याऐवजी अनुदान घेण्यामध्ये स्वारस्य

**भास्कर जामकर/नांदेड**

अन्नधान्याऐवजी रोख अनुदान योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक ७३ हजार २८९ शेतकरी कुटुंबातील २ लाख ८७ हजार ७९४ (सदस्य) लाभार्थींना अन्नधान्याऐवजी दर महिन्याला १७० रुपये मिळू शकतात. आतापर्यंत ३२ हजार ५१७ शेतकरी कुटुंबीयांनी हा पर्याय स्वीकारला असून, गत १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत त्यांच्या बँक खात्यात ३२ कोटी ५९ लाख ४८ हजार ६४३ रुपये जमा झाले. मात्र, ४० हजार ७७२ शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत अर्जासह बँक तपशील न दिल्यामुळे दर महिन्याला मिळणाऱ्या १७० रुपयांच्या अनुदानापासून ते वंचित राहत आहेत. यामुळे पात्र लाभार्थींना आपल्या गावातील रेशन दुकानदाराकडून अर्ज व बँक तपशील सादर करण्याचे आवाहन पुरवठा विभागाने केले आहे. याला लाभार्थी कसा प्रतिसाद देतात, त्यावरच आता योजनेचे फलित ठरणार आहे.

राज्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, उस्मानाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वर्धा अशा एकूण १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना प्रतिसदस्य ५ किलो धान्य दर महिन्याला दिले जात होते. यात २ रुपये किलो गहू तर ३ रुपये किलो तांदूळ मिळते. सदर योजनेकरिता आवश्यक असलेले गहू २२ रुपये किलो तर तांदूळ २३ रुपये किलोने केंद्र सरकार खरेदी करते मात्र, यापुढे गहू व तांदूळ उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाकडून ३१ मे २०२२ व १ सप्टेंबर २०२२ च्या पत्राद्वारे कळवले होते. त्यामुळे शेतकरी योजनेतील लाभार्थींना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम देण्याची योजना राज्य शासनाने हाती घेतली. २८ फेब्रुवारी २०२३ रोजी तसा शासन निर्णय काढत योजनेची अंमलबजावणी सुरू झाली.

सुरुवातीला १५० रुपये प्रति सदस्य देण्यात येत होते. २०२४ पासून यात वाढ झाली असून, प्रति सदस्य १७० रुपये दिले जात आहे. याला नांदेड जिल्ह्यातील ७० टक्के लाभार्थींनी प्रतिसाद दिल्यामुळे उर्वरित लाभार्थी योजनेपासून वंचित राहत असून, त्यांना धान्यही मिळत नाही व दरमहा रोख अनुदानापासून वंचित रहावे लागत आहे.



### रेशन दुकानदाराकडे जमा करा ही कागदपत्रे

कुटुंबप्रमुख महिलेचा पासपोर्ट फोटो असलेल्या रेशन कार्डची झेरॉक्स प्रत, सातबारा, सर्व सदस्यांचे आधार कार्ड व बँक खाते क्रमांक नमूद करून एक अर्ज रेशन दुकानदाराकडे जमा करण्याचे काम सुरू आहे.

### आरसीएमएसवर नोंद असल्यावरच लाभ

या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शिधापत्रिकेवर नोंद असलेल्या सर्व सदस्यांचे आधार क्रमांक शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीशी (रेशन कार्ड मॅनेजमेंट सिस्टम -आरसीएमएस) संलग्न असणे आवश्यक आहे. अर्थात आरसीएमएस प्रणालीवर आधार संलग्न असलेल्या लाभार्थींनाच डीबीटी योजनेचा लाभ मिळणार आहे.

> शासनाकडून केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतर योजना सुरू करण्यात आलेली आहे. यानुसार जिल्ह्यातील लाभार्थींची माहिती संकलित केली जात आहे. आतापर्यंत जवळपास ७० टक्के लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. पात्र सर्वच लाभार्थींनी संमतीपत्र व बँक खात्याचा तपशील दिल्यास त्यांनाही दर महिन्याला प्रति लाभार्थी १७० रुपये मिळतील, मागणीप्रमाणे शासनाकडून निधी वितरित केला जात आहे. उर्वरित ३० टक्के लाभार्थ्यांनी आपल्या कागदपत्रांचा तपशील जमा करावा.
>
> **- रूपाली चौगुले,**
> जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड.